cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२४८ | सोमवार दि.०५ जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### तरच भविष्यकाळ उज्वल असेल...

भारत आता जगातील चौथ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. हे वृत्त काही दिवसांपूर्वीच झळकले आणि त्यावर मोठी चर्चा होत आहे. चौथा क्रमांक पटकाविताना भारताने जपानला मागे टाकले आहे. आता जर्मनी, चीन आणि अमेरिका हे तीन देश स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या दृष्टीने भारतापेक्षा वरच्या क्रमांकावर आहेत.

# कृषी योजनांचा निधी मार्च अखेरपर्यंत खर्च करा

## केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांचे राज्यांना निर्देश

नवी दिल्ली । प्रतिनिधी

**केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी राज्यांच्या कृषी मंत्र्यांसोबत एक महत्त्वाची आढावा बैठक घेतली. या बैठकीत प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना आणि कृषोन्नती योजना यांसारख्या केंद्र पुरस्कृत योजनांची प्रगती तसेच त्यांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीच्या वापराबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.**

बैठकीला संबोधित करताना केंद्रीय मंत्री चौहान म्हणाले की, अनेकदा केवळ प्रशासकीय आणि प्रक्रियात्मक त्रुटींमुळे बजेट वाटपास विलंब होतो, ज्याचा थेट परिणाम योजनांच्या अंमलबजावणीवर होतो. त्यामुळे राज्यांनी त्यांना आवंटित केलेला निधी मार्च महिन्यापूर्वी खर्च करणे अनिवार्य आहे. जर राज्यांनी वेळेत निधी खर्च केला नाही, तर त्याचे नुकसान राज्यांनाच सोसावे लागते. राज्यांनी योग्य नियोजनाद्वारे निधीचा वापर केल्यास केंद्राकडून पुढील हप्ता वेळेवर जारी करणे सुलभ होईल आणि योजनांचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल, असे त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीत प्रामुख्याने पीएम–किसान योजनेच्या लाभार्थी शेतकऱ्यांचे त्वरित प्रमाणीकरण करणे, पीक विमा योजनेची व्याप्ती वाढवून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना त्यात सामावून घेणे आणि विम्याच्या




दाव्यांचे वेळेत निकाल लावणे यावर विशेष भर देण्यात आला. यासोबतच आगामी हंगामासाठी बियाणे आणि खतांची उपलब्धता, त्यांचा संतुलित वापर आणि केंद्र व राज्यांमधील समन्वय अधिक भक्कम करण्यावरही चर्चा करण्यात आली. या महत्त्वपूर्ण बैठकीत महाराष्ट्राचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासह उत्तर प्रदेशचे सूर्य प्रताप शाही, राजस्थानचे डॉ. किशोरी लाल मीणा, उत्तराखंडचे गणेश जोशी आणि मिझोरामच्या कृषी मंत्र्यांनी सहभाग घेतला. तसेच कृषी सचिव देवेश चतुर्वेदी आणि मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. ▶▶ पान २ वर

# ...तर बिनविरोध उमेदवाराची लढत नोटा सोबत

मुंबई । प्रतिनिधी

राज्यामध्ये महानगरपालिकांच्या निवडणुका सुरू आहेत. अशातच महायुतीचे जवळपास ६८ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. मात्र यावर राज ठाकरेंसह विरोधी पक्षाने आक्षेप घेतला आहे, आणि निवडणूक आयोगाने माहिती देखील मागवली आहे. आयोगानेच नकारार्थी मतदारांसाठी नोटा हा पर्याय ठेवलेला आहे. त्यामुळे बिनविरोध आलेल्या उमेदवाराला निवडणूक लढवावी लागेल, पण प्रतिस्पर्धी असेल नोटा. तशा हालचाली सुरू असल्याचे सूत्राकडून समजते.

राज्यामध्ये मागील महिन्यामध्ये नगरपालिका आणि नगरपंचायत च्या निवडणुका झाल्या. त्या पारही पडल्या मात्र त्यानंतर मुंबई शहरासह राज्यातील अन्य महानगरपालिकेच्या निवडणुका सुरू आहेत.




उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर आता प्रत्यक्ष प्रचाराला सुरुवात झाली असताना, काही नगरसेवक बिनविरोध निवडून आले. सत्ताधारी पक्षांनी दबावतंत्र वापरून हा प्रकार केला असावा असा संशय विरोधकांना असून, तसा आरोपही विरोधकांनी केला आहे. यातच भाजप आणि महायुतीचे जवळपास ६८ नगरसेवक मुंबई, नवी मुंबई, ठाणे आदी भागांमध्ये बिनविरोध झाले आहेत. ▶▶ पान २ वर

### तर नोटाचा काय उपयोग


आयोगानेच ईव्हीएम मशीनवर उमेदवार व त्यांचे चिन्ह याबरोबरच मतदारांना पर्याय म्हणून नोटा हा देखील ठेवलेला आहे. ज्या ठिकाणी बिनविरोध उमेदवार झाले त्या ठिकाणी नोटा पर्याय असतानाही उमेदवार विजयी कसे घोषित केले असा सवाल तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे जो अविरोध घोषित केला. कदाचित तेथील मतदारांना तोही नको असेल तर नोटाला मतदान करू शकतात. यावरच आयोगा आणि राजकीय पक्षांमध्ये खल सुरू आहे.

# रेबीज प्रतिबंधक लसीचा साठा सर्व रुग्णालयांत ठेवा

## राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे यंत्रणेला आदेश; सर्वोच्च न्यायालयाचे होते निर्देश

पुणे । प्रतिनिधी

भटक्या कुत्र्यांच्या चाव्यामुळे होणाऱ्या रेबीज आजाराचा धोका लक्षात घेता देशातील सर्व सरकारी व खासगी रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालयांनी रेबीज प्रतिबंधात्मक लस आणि रेबीज इम्युनोग्लोब्युलिनचा पुरेसा साठा कायमस्वरूपी उपलब्ध ठेवावा, असे निर्देश राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात दिलेल्या आदेशानंतर आयोगाने हे निर्देश जारी केले आहेत.



कुत्री किंवा इतर प्राण्यांच्या चाव्यांच्या रुग्णांना तत्काळ उपचार मिळावेत यासाठी रेबीज ▶▶ पान २ वर

# सहा कि.मी. पायपीट करूनही गरोदर मातेसह बाळाचाही मृत्यू !

## स्वत: मुख्यमंत्र्यांनी पालकत्व स्विकारलेल्या गडचिरोली जिल्ह्यात दुर्दैवी घटना

गडचिरोली । प्रतिनिधी

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालकत्व स्वीकारलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम भागात आरोग्य व्यवस्थेचे धिंडवडे निघत असल्याची ताजी घटना उघडकीस आली आहे. एटापल्ली तालुक्यातील आलदंडी टोला येथील एका तरुण आदिवासी गरोदर महिलेला सहा किलोमीटरची पायपीट करूनही जीव गमवावा लागला आहे. तिच्यासोबत पोटातील बाळाचाही करुण** ▶▶ पान २ वर



# विरोधक कोर्टात गेले तरी आमचाच विजय–फडणवीस

चंद्रपूर । प्रतिनिधी

**महाराष्ट्र महानगरपालिका निवडणुकांच्या रणधुमाळीत महायुतीने मिळवलेल्या बिनविरोध विजयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना थेट प्रत्युत्तर दिले. विरोधकांनी खुशाल न्यायालयात जावे, मात्र जनतेच्या न्यायालयात आमचा विजय झाला आहे आणि**



**कोर्टातही जनतेचाच कौल जिंकेल, असा ठाम विश्वास त्यांनी रविवारी येथे व्यक्त केला.**

येत्या १५ जानेवारीला राज्यातील महानगरपालिकांसाठी मतदान होणार आहे. मात्र, त्यापूर्वीच भाजप आणि महायुतीच्या मित्रपक्षांनी ६८ जागांवर बिनविरोध विजय मिळवत विरोधकांवर मोठी आघाडी घेतली आहे. यावरून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर धाकदपटशहा आणि पैशांचा वापर केल्याचा आरोप केला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) या बिनविरोध निवडीला न्यायालयात आव्हान देण्याचे संकेत दिले आहेत. चंद्रपूर येथील रोडशो दरम्यान पत्रकारांशी संवाद साधताना फडणवीस ▶▶ पान २ वर

# देवाभाऊ मुख्यमंत्री आहे, तोपर्यंत लाडकी बहीण योजना कुणीही बंद करू शकणार नाही–फडणवीस

अकोला। प्रतिनिधी

**ऐन निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अकोल्यात लाडकी बहीण योजनेवर मोठं विधान केले आहे. जोपर्यंत तुमचा देवाभाऊ मुख्यमंत्री आहे, तोपर्यंत लाडकी बहीण योजना कुणीही बंद करू शकणार नाही, असा पुनरुच्चार फडणवीसांनी केला.**

भाजप आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या महायुतीच्या प्रचार सभेसाठी देवेंद्र फडणवीस अकोल्यात आले होते. क्रिकेट क्लब मैदानावर झालेल्या या सभेला पालकमंत्री आकाश फुंडकर, राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी, भाजप आमदार रणधीर सावरकर, प्रकाश भारसाकळे, हरीश पिंपळे, वसंत खंडेलवाल यांच्यासह महायुतीचे प्रमुख नेते उपस्थित होते. यावेळी फडणवीस यांनी राज्यातील लहान महापालिकांसाठी मोठी घोषणा करत सांगितले की, विकास योजनांमध्ये यापुढे ▶▶ पान २ वर

# मावळ मधील सोएक्स इंडिया कंपनीवर छापा ३१ कोटीं ६७ लाखाचा मुद्देमाल जप्त

पुणे । प्रतिनिधी

**जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील टाकवे येथील 'मे. सोएक्स इंडिया प्रा. ली.' या कंपनीवर छापा टाकून अन्न व औषध प्रशासनाने तब्बल ३१ कोटी ६७ लाख २१ हजार ९८७ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी कंपनीचे संचालक आणि व्यवस्थापकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती अस्मिता टोणपे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ही कारवाई २ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आली. यापूर्वी १ डिसेंबर २०२५ रोजी या कंपनीच्या उत्पादनांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले होते. मुंबईतील अन्न विश्लेषकांच्या अहवालानुसार, या नमुन्यांमध्ये 'निकोटिन' पॉझिटिव्ह आढळले. हे उत्पादन मानवी आरोग्यास घातक असून महाराष्ट्र सरकारने १६ जुलै २०२५ रोजी काढलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करणारे असल्याचे स्पष्ट झाले.एकूण किंमत ३१ कोटी ६७ लाख,२१,९८७ रुपये (३१.६७ कोटी)रुपयांचे विविध फ्लेवर्सचे तयार ▶▶ पान २ वर

## शिवसेना भवनात ठाकरे बंधूंनी केला संयुक्त वचननामा प्रकाशित

# महायुती सरकारवर हल्लाबोल

मुंबई । प्रतिनिधी

**मुंबईसह राज्यभरातील महापालिकांच्या निवडणुकीमुळे राजकीय वातावरण तापले असतानाच रविवारी (दि. ४) शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे दोन्ही बंधू संयुक्त वचननामा प्रकाशित केला. यावेळी दोन्ही नेत्यांनी महायुती सरकारवर हल्लाबोल केला. सत्तेचा ताम्रपट घेऊन कोणी आलेला नाही, असा इशारा राज ठाकरे यांनी दिला.**

महापालिका निवडणूकीच्या प्रचारासाठी काही दिवसांचाच अवधी उरला असतानाच



ठाकरे बॅण्ड प्रचाराच्या मैदानात उतरले आहेत. रविवारी शिवसेना भवन येथे उद्धव व राज ठाकरे यांनी दोन्ही पक्षांचा संयुक्त वचननामा जाहीर केला. या वचननाम्यामध्ये मुंबईकरांना पायाभूत सुविधा, वाहतूक, स्वच्छता, मराठी माणसाचे प्रश्न, महापालिकेतील प्रशासनातील पारदर्शकता, हिंदुत्व आदी मुद्यांवर ठोस आश्वासने दिली आहेत. शिवसेना भवन येथे उद्धव व राज ठाकरे यांची संयुक्त पत्रकार परिषद झाली. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, २० वर्षानंतर आम्ही दोघे भाऊ शिवसेना भवनात एकत्र आल्याचा आनंद आहे. शिवशक्तीचा वचननामा प्रसिद्ध करत आहे. देशातील लोकशाही संपून झुंडशाही सुरू आहे. मतचोरी पकडल्यानंतर साम, दाम, दंड, भेद, वापरून ▶▶ पान २ वर

### » मुंबईचा महापौर मराठीच होणार

पेशव्यांच्या काळात तीन संस्थाने निर्माण झाली. बडोद्याचे साम्राज्य मराठ्यांचे पण तिथे गुजराती महापौर कसे? असा सवाल करत मुंबईचा महापौर मराठीच होणार असल्याचा पुनरूच्चार राज ठाकरे यांनी केला. ५ जानेवारीपासून प्रचाराचा बिगुल वाजणार असून शिवसेना (उद्धव ठाकरे गट) आणि मनसे या युतीचा प्रचार संयुक्त ठाकरे शैलीत होणार आहे. उद्धव व राज यांच्या मुंबईत तीन सभा होणार आहेत.

## थोडक्यात...

### देशातील ५२ टक्के गर्भवतींना 'ॲनिमिया'!

मुंबई: 'राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण–५'च्या ताज्या आकडेवारीनुसार, देशातील ५२.२% गर्भवती महिला ॲनिमिया (रक्तक्षय) ग्रस्त असल्याचे उघड झाले आहे. ही परिस्थिती केवळ मातांच्या आरोग्यासाठीच नव्हे, तर होणाऱ्या बाळाच्या भविष्यासाठीही चिंताजनक ठरत आहे. एनएफएचएस–४ (२०१५–१६) च्या तुलनेत एनएफएचएस–५ (२०१९–२१) मध्ये ॲनिमियाच्या प्रमाणात वाढ झाल्याचे आढळले. हिमोग्लोबिन कमी झाल्यामुळे होणारा हा आजार माता मृत्यूदरासाठी एक मुख्य कारणीभूत घटक ठरत आहे. ॲनिमियामुळे बाळाचा जन्म वेळेआधी होणे आणि जन्माच्या वेळी बाळाचे वजन कमी भरणे यांसारख्या समस्या उद्भवत आहेत. महाराष्ट्रातील ४५% ते ५०% गर्भवती महिला ॲनिमियाने त्रस्त आहेत. राज्यात 'ॲनिमियामुक्त भारत' मोहिमेंतर्गत लोहाच्या गोळ्यांचे वाटप केले जात असले, तरी आहाराबाबत अजूनही जनजागृतीची गरज आहे.

### ठाकरेंचा वचननामा नव्हे तर अपचननामा – भाजप

मुंबई: मुंबई महापालिका निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना आणि राज ठाकरे यांच्या मनसेचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. या जाहीरनाम्यावर सत्ताधारी भाजपकडून जोरदार टीका झाली आहे. भाजप नेते व मंत्री आशिष शेलार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, ठाकरे बंधूंनी दिलेली आश्वासने नागरिकांच्या पचनी पडण्यासारखी नाहीत. त्यामुळे हे वचननामा नव्हे तर अपचननामा आहे. शेलारांनी शिवसेनेच्या मुंबई महापालिकेतील कारभाराचा उल्लेख करत, भाजपकडून येत्या काळात भ्रष्टाचाराचा सर्व लेखाजोखा जनतेसमोर आणला जाईल, असे सांगितले. त्यांनी मतदारांना ठाकरे बंधूंवर गोंधळ न करता भाजपच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचे आवाहन केले. दरम्यान, मुंबई भाजपचे प्रदेशाध्यक्ष अमित साटम यांनी देखील जाहीरनाम्यावर टीका केली आहे.

### बिहार सरकार खेळाडुंना देणार ५ लाखांची मदत

पाटणा: बिहारमधील खेळाडूंच्या कल्याणासाठी राज्य सरकार अनेक महत्त्वाकांक्षी योजना प्रत्यक्ष जमिनीवर उतरवत आहे. आता प्रतिभावान युवा खेळाडूंना शिष्यवृत्ती आणि प्रायोजकत्व देऊन त्यांना राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्याची संधी दिली जाईल, अशी घोषणा बिहारच्या क्रीडा आणि आयटी मंत्री श्रेयसी सिंह यांनी केली आहे. पत्रकारांशी बोलताना श्रेयसी सिंह यांनी सांगितले की, खेळाडूंना सामान्यत: पदक जिंकल्यानंतर बक्षीस दिले जाते, परंतु बिहार सरकारने ही पद्धत बदलली आहे. आता खेळाडूंमधील प्रतिभा ओळखून त्यांना प्रशिक्षणादरम्यानच मदत केली जाईल. बिहार सरकारच्या 'मेडल लाओ, नौकरी पाओ' या योजनेमुळे खेळाडूंना रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. गेल्या वर्षी या योजनेअंतर्गत ७१ खेळाडूंना सरकारी नोकऱ्या देण्यात आल्या होत्या. आता हा आकडा ८८ वर पोहोचला असून, आगामी काळात यात मोठी वाढ होण्याची शक्यता आहे.

### नवोदय विद्यालयातील विद्यार्थिनीने संपवले जीवन

लातूर: लातूर येथील जवाहर नवोदय विद्यालयात शिकणाऱ्या सहावीतील एका अल्पवयीन विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मृत विद्यार्थिनीचा मृतदेह मुलींच्या वसतिगृहातील खोलीत पलंगाला लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. ही विद्यार्थिनी अत्यंत हुशार आणि चुणचुणीत असल्याचे सांगितले जात असून, तिने टोकाचे पाऊल उचलल्याच्या घटनेमुळे कुटुंबीयांसह शैक्षणिक वर्तुळात हळहळ व्यक्त केली जात आहे. मृत विद्यार्थिनीचे वडील औसा तालुक्यातील टाका गावातील रहिवासी असून ते मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. नातेवाईकांनी हा प्रकार आत्महत्या नसून घातपाताचा असल्याचा गंभीर आरोप केला आहे. त्यामुळे या प्रकरणाला संशयाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. आत्महत्या की घातपात, याचा उलगडा करण्यासाठी पोलिस सर्व बाजूंनी तपास करत असून वसतिगृहातील कर्मचारी, शिक्षक आणि विद्यार्थ्यांची चौकशी केली जात आहे.

### जपान, दक्षिण कोरियामध्ये आणीबाणीचा इशारा

टोकियो/सोल: नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच जगभरात चिंतेचे वातावरण आहे. एकीकडे अमेरिकेने व्हेनेझुएलावर आक्रमण करत त्या देशाच्या राष्ट्राध्यक्षांना ताब्यात घेतलेले असताना दुसरीकडे उत्तर कोरियाने खळबळ उडवून दिली आहे. रविवारी पहाटे उत्तर कोरियाने आपल्या पूर्व किनारपट्टीवरून जपानच्या समुद्रात संशयास्पद बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली. या अनपेक्षित चाचणीमुळे जपान आणि दक्षिण कोरियामध्ये तात्काळ आणीबाणीचा इशारा देण्यात आला असून, दोन्ही देशांचे लष्कर हाय अलर्टवर ठेवण्यात आले आहे. जपानच्या संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, उत्तर कोरियाने डागलेली ही क्षेपणास्त्रे जपानच्या एक्सक्लुझिव्ह इकॉनॉमिक झोनच्या बाहेर समुद्रात पडली. मात्र, या प्रक्षेपणामुळे जपान सरकारने काही काळासाठी नागरिकांना सुरक्षित स्थळी जाण्याचे आवाहन केले होते.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२ जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

गहू: १९.०० क्विंटल

| किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- |
| २,४०० | २,८२६ | २,५९६ |

ज्वारी/हायब्रिड: ४८.५० क्विंटल

| किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- |
| २,८७० | ३,८१० | ३,२८३ |

मका/लोकल: ३.५० क्विंटल

| किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- |
| १,५०० | १,५०० | १,५०० |

तूर : १६.०० क्विंटल

| किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- |
| ५,६०१ | ६,७०० | ६,३१७ |

उडीद : २.५० क्विंटल

| किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- |
| ४,००१ | ५,७५० | ४,८८४ |

बाजरी: २७.५० क्विंटल

| किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- |
| २,४८१ | ३,१२० | २,९८४ |

मुग: १.०० क्विंटल

| किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- |
| ५,३०१ | ५,३०१ | ५,३०१ |

सोयाबीन: १५७.०० क्विंटल

| किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- |
| ४,५५१ | ४,७२१ | ४,६८१ |

हरभरा: १५.५० क्विंटल

| किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- |
| ४,३०० | ५,४१० | ४,९६५ |

cmyk

## अग्रलेख

# तरच भविष्यकाळ उज्वल असेल...

भारत आता जगातील चौथ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. हे वृत्त काही दिवसांपूर्वीच झळकले आणि त्यावर मोठी चर्चा होत आहे. चौथा क्रमांक पटकाविताना भारताने जपानला मागे टाकले आहे. आता जर्मनी, चीन आणि अमेरिका हे तीन देश स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या दृष्टीने भारतापेक्षा वरच्या क्रमांकावर आहेत. त्यांच्यापैकी जर्मनीला भारत येत्या पाच वर्षांमध्ये मागे टाकू शकेल, अशी स्थिती आहे. भारताच्या या प्रगतीचे अनेक आयाम आहेत. सध्याचा कालावधी जागतिक आर्थिक अस्थिरतेचा आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी त्यांच्या व्यापार शुल्क आणि इतर धोरणांमुळे जगाच्या अर्थकारणाची दिशा पालटविल्याचे दिसून येते. अमेरिकेच्या या धोरणांचा परिणाम अमेरिकेच्या प्रतिस्पर्धी देशांप्रमाणेच अमेरिकेच्या मित्र देशांना आणि संरक्षणासाठी किंवा अन्य कारणांसाठी अमेरिकेवर जे देश अवलंबून आहेत, त्यांच्यावरही होत आहे. याच ओघात अमेरिकेने भारतावर ५० टक्के व्यापार शुल्क लागू केले.

भारताच्या निर्यातीत सर्वात मोठा वाटा गेल्या काही वर्षांमध्ये अमेरिकेचा राहिलेला आहे. साहजिकच, ५० टक्के व्यापार शुल्काच्या दबावात भारताची अमेरिकेला होणारी निर्यात सुकून जाईल आणि अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसेल, अशी काही जणांची अटकळ होती. अमेरिकेचे शुल्क लागू झाल्यानंतर पहिल्या दोन महिन्यांपर्यंत ही अटकळ खरी ठरणार, अशी शक्यताही होती. तथापि, या आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीपासून परिस्थिती पालटावयास प्रारंभ झाला आहे. दुसऱ्या तिमाहीत भारताचा विकासदर ८.२ टक्के राहिला. अनेकांच्या नकारात्मक अपेक्षांना त्यामुळे मोठाच धक्का बसला. भारताच्या निर्यातीत नोव्हेंबर महिन्यात तब्बल २२ टक्के वाढ झाली. इतकेच नव्हे, तर प्रत्यक्ष अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीतही १८ टक्के वाढ झाली. हे श्रेय केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणांचे आणि दबावाखाली न येण्याच्या वृत्तीचे आहे. आजच्या आव्हानात्मक काळातही भारताचा विकास दर जगात अन्य कोणत्याही देशापेक्षा अधिक आहे. भारत आर्थिक भक्कम झाला आहे, याचेच हे द्योतक मानावे लागेल. २०१४ मध्ये अर्थव्यवस्थेच्या आकाराच्या संदर्भात भारताचा क्रमांक जगात अकरावा होता. आता भारताने वार्षिक स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या संदर्भात सहा देशांना मागे टाकले. त्यांच्यात ब्रिटन आणि फ्रान्स या जागतिक महासत्तांचाही समावेश आहे. अर्थातच, या यशाची एक दुसरी बाजूही आहे. ती म्हणजे, एकंदर स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात भारताचा जगात चौथा क्रमांक असला, तरी प्रतिव्यक्ती उत्पन्नात भारत अजूनही बराच मागे आहे. कारण भारताची लोकसंख्या बरीच मोठी आहे. भारताचे प्रतिव्यक्ती वार्षिक उत्पन्न साधारणत: २ हजार ४०० डॉलर्स, अर्थात २ लाख १४ हजार रुपयांपर्यंत आहे. तर भारताने नुकत्याच मागे टाकलेल्या जपानचे प्रतिव्यक्ती उत्पन्न भारताच्या जवळपास १६ पट अधिक, अर्थात ३३ हजार डॉलर्स इतके आहे. तर जर्मनीचे प्रतिव्यक्ती वार्षिक उत्पन्न जवळपास ५६ हजार डॉलर्स, अर्थात भारताच्या २७ पट अधिक आहे. भारताच्या आर्थिक प्रगतीकडे नकारात्मक दृष्टीने पाहण्याची सवय असणारे 'विचारवंत' नेमक्या याच मुद्द्यावर भर देतात आणि भारताची आर्थिक प्रगती किंवा चौथा क्रमांक हा भुलभुलैया आहे, असे प्रतिपादन करतात. पण त्यांनी ही बाब लक्षात घेतली पाहिजे, की साधारणत: साडेअकरा वर्षांपूर्वी भारताचा क्रमांक जेव्हा जगात ११ वा होता, तेव्हा भारताचे प्रतिव्यक्ती उत्पन्न (महागाई दराचा हिशेब जमेस धरुनही) सध्यापेक्षा बरेच कमी होते. २०१४ प्रारंभी ते साधारणत: प्रतिवर्ष ७४ हजार रुपये किंवा डॉलरच्या हिशेबात १ हजार २०० डॉलर्स इतके होते. याचाच अर्थ असा की गेल्या साधारणत: १० वर्षांमध्ये भारतीय नागरिकाच्या सरासरी वार्षिक उत्पन्नात डॉलरच्या हिशेबात साधारणत: दुप्पट, तर रुपयाच्या हिशेबात साधारणत: तिप्पट वाढ झाली आहे. याच काळात डॉलरच्या किमतीतही वाढ झाली आहे. तो हिशेब जमेस धरता गेल्या दहा वर्षांमध्ये प्रत्येक भारतीय नागरिकाच्या सरासरी वार्षिक उत्पन्नात दुप्पट वाढ झाली, असे म्हणता येते. या कालावधीतील बव्हंशी वर्षांमध्ये आपला विकासदर जगात सर्वाधिक राहिला आहे. म्हणूनच आपण सहा देशांना मागे टाकून चौथ्या क्रमांकावर पोहचलो आहोत. गेल्या १० वर्षांमध्ये भारताने त्याच्या मागच्या १० वर्षांच्या तुलनेत किती प्रगती केली हे आणखी एका महत्त्वाच्या तौलनिक आकडेवारीवरुन सिद्ध होत आहे. २०१४ मध्ये भारताचा जागतिक स्थूल उत्पन्नात सध्याच्या डॉलरच्या दराच्या तुलनेत वाटा अवघा २.६ टक्के होता. तर पर्चेस पॉवर पॅरिटी (पीपीपी) च्या संदर्भात तो ६.८ टक्के होता. आज १० वर्षांनंतर २०२४ च्या आकडेवारीनुसार तो अनुक्रमे ४.०० टक्के आणि ८.४० टक्के इतका आहे. २०२५ मध्ये तर तो या दोन्ही संदर्भांमध्ये अधिकच वाढला आहे. त्यातही २०२० ते २०२२ ही दोन वर्षे कोरोनाच्या उद्रेकाने खाल्ली. त्यांचा विचार करता, भारताची आर्थिक प्रगती लक्षणीय असल्याचे (दृष्टी समतोल आणि नि:पक्षपाती असेल तर) समजावयास काहीही अडचण नाही. मात्र, याचा अर्थ असा नाही, की भारत आज आर्थिक महासत्ता झाला आहे. भारताला अद्याप प्रगतीची बरीच शिखरे गाठावयाची आहेत. स्वदेशी तंत्रज्ञान विकास हा कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाचा आधारस्तंभ असतो. पण तो भक्कम करण्याकडे भारताने स्वातंत्र्यप्राप्तीपासून कधीही मनापासून लक्ष दिले नाही. मात्र, सध्याचे केंद्र सरकार 'आत्मनिर्भरते'च्या धोरणाच्या माध्यमातून ही त्रुटी भरुन काढण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहे. हाच प्रयत्न पुढची किमान २० वर्षे अधिकाधिक जोमाने केला, तर भारत अर्थव्यवस्थेच्या आकाराच्या संदर्भात जगात प्रथम तीन देशांमध्ये स्थान निश्चितपणे मिळवू शकतो. मात्र, त्यासाठी धोरणसातत्य, अविरत कष्ट, लक्ष्यकेंद्री (फोकस्ड) प्रयत्न आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा विकास या चौसूत्रीचा उपयोग करावाच लागणार आहे. तसेच, राजकीय स्वार्थासाठी आणि श्रेयवादाच्या झटापटीत प्रगतीच्या मार्गात अडथळे निर्माण करण्याची क्षुद्र सवय राजकारण्यांनी, तसेच लोकनेते म्हणून घेणाऱ्या उठवळ, उपटसुंभ आणि दांभिक व्यक्तींनी सोडली पाहिजे. तसे झाल्यास भविष्यकाळ आपलाच आहे, याची निश्चिती आणि शाश्वती देता येत आहे.

# वीर भगतसिंग इंग्रजी शाळेची दादागिरी

## फीससाठी शाळा अध्यक्षांकडून पालकास मारहाण व जीवे मारण्याची धमकी; संस्था चालकांवर कठोर कारवाईची ग्रामस्थांची मागणी

जालना ।प्रतिनिधी

**आपली पाल्य कु.ध्यानी प्रवेश येवले हिची फिस बाकी राहिल्यामुळे वीर गतसिंग इंग्रजी शाळेचे अध्यक्ष डिगंबर अरुण सरकटे रा. तळणी ता. मंठा यांनी आपणास मारहाण केली व जीवे मारण्याची धमकीही दिली. याप्रकरणी पोलिस ठाण्यात तक्रार करण्यात आली असून जिल्हा पोलिस अधिक्षकांना निवेदनही देण्यात आले आहे. या राज्यामध्ये मुला मुलींना शिकवा का नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे यामुळे गरीबाच्या मुला मुलींना कुठे शिकावं असा प्रश्न उपस्थित होत आहे. सदरील असाच प्रकार बदनापूर व अंबड येथे आर पी इंग्लिश स्कूलमध्ये घडत आहे याप्रकरणी चौकशी करणे गरजेचे आहे.दरम्यान, केवळ फीस राहिली म्हणून अध्यक्ष का होईना परंतू अशाप्रकारे पालकांना धमकावू शकत नाही. यामुळे खाजगी इंग्रजी शाळांची दादागिरी वाढली आहे. या ना त्या कारणाने सदरील इंग्रजी शाळांना ह्या विद्यार्थ्यांना वेठीस धरत असून अशा शाळांवर कडक निर्बंध घालावेत, अशी आग्रही मागणी गावकऱ्यांनी केली आहे.**

सदर निवेदनात म्हटले की, कु. ध्यानी प्रवेश येवले ही विर भगतसिंग इंग्शिल स्कुल तळणी ता. मंठा येथे शिक्षण घेत आहे. माझ्या मुलीची फिस बाकी असल्यामुळे दि.३०/१२/२०२५ रोजी दुपारच्या सुमारास शाळेच्या गाडीचे ड्रायव्हर श्री.मंगेश पावडे यांच्या दुरध्वनीवरुन मला फोन आला व बाकी राहिलेल्या फिस पेक्षा जास्त फिस ची मागणी केली. त्यानुसार मी त्यांना फिस जास्त देणार नाही, नाहीतर आमचे गावातील सर्व मुले काढून घेईल. आम्हांला परवडत नाही असे सांगितले. तेव्हा ते मला म्हणाले की तुम्ही अध्यक्षांना बोलून घ्यापरंतू मी अध्यक्षांना बोललो नाही. याचे शटर बंद करून याला उघड करुन मारहाण करायची आहे गावात उघडे करून दिंड काढायची आहे. या भितीने मी माझा जिव वाचवून पळालो परंतू त्यांनी धमकी दिली की, याचे शटर बंद करुन याला उघड करुन मारहाण करायची आहे व गावात उघडे करून दिंड काढायची आहे. या भितीने मी माझा जिव वाचवून पळून गेलो व पोलीस स्टेशन गाठले, झालेला सर्व प्रकार ठाणे अंमलदारांना सांगितल्यानंतर त्यांनी एनसीआर ०८०४/२०२५ दि.३०/१२/२०२५ रोजी दाखल करुन घेतली व मला समज देवून सांगितले तुझ्या जिवाला काही होणार नाही. तसेच दुसऱ्या दिवशी दि.३१/१२/२०२५ रोजी गावातील काही पालकांना घेवून मी शाळेत गेला असता तेथेही पुन्हा त्यांनी आरेरावीची भाषा केली व मी मनोजदादा जरांगे यांचा कार्यकर्ता असल्यामुळे माझ्या गळ्यातील रुमाल पाहून मला मराठा योध्दे मनोज जरांगे पाटील यांच्या नावे शिवीगाळ केली व जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या. संबधीत संस्था चालक पालकांना फि न मागता लहान मुलांना वेठीस धरून तुझ्या वडिलांकडून शाळेची संपुर्ण फि घेवून ये नसता शाळेत येवू नको, अशा धमक्या व दम देतात. त्यामुळे लहानमुले शाळेत जाण्यास घाबरत आहेत, सदरील संस्था चालक शाळेच्या आवारात किंवा शाळेला भेट देणाऱ्या पालकांना शाळेत येवू देत नाही. त्यांची दहशत फार मोठी आहे. स्वतः सैन्यातून सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांच्याकडे बंदुकीचे लायसन्स आहे. त्याच्या जोरावर त्याचे कुटूंब व वाहन चालक आरेरावी करत असतात. संबधीतापासून मला व माझ्या पाल्यास व परिसरातील पालकांना भिती वाटत आहे व तो कधीही मला जिवे मारु शकतो. करीता मला पोलीस संरक्षण द्यावे व संबधीतावर कठोर कार्यवाही करावी, अशी मागणी श्री. येवले यांनी केली असून या निवेदनाच्या प्रती त्यांनी जिल्हाधिकारी जालना, मुख्य कार्यकारी अधिकारी मॅडम, जि.प. जालना,शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प. जालना व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. जालना यांनाही दिल्या आहेत. तर या निवेदनासोबतच काही गावकऱ्यांची नावे व स्वाक्षऱ्या देखील आहेत.

# रवींद्र बांगर यांचे दु:खद निधन

बीड । प्रतिनिधी



**तालुक्यातील बांगर वाडा येथील रहिवासी ह भ प जनार्दन महाराज बांगर यांचे पुतणे व काशिनाथ बांगर यांचा मुलगा रवींद्र बांगर याचे रविवारी अपघाती दु:खद निधन झाले.**

बांगरवाडा येथील श्री काशिनाथ हरिभाऊ बांगर यांचा मुलगा रवींद्र काशिनाथ बांगर यांचे अपघाती दु:खद निधन झाले आहे. त्यांचा अंत्यविधी आज दिनांक ०५/०१/२०२६ सोमवारी सकाळी १०.०० वाजता पोखरी झांजुर्णे वस्ती तालुका जिल्हा बीड या ठिकाणी होणार आहे. रवींद्र बांगर यांच्या पश्चात आई वडील सुलता भाऊ पत्नी एक मुलगी असा परिवार आहे बांगर कुटुंबीयावर कोसळलेल्या दु:खात लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

# सावित्रीबाई फुले जयंती निमित्त रॅलीचे आयोजन




बीड । प्रतिनिधी

थोर समाजसुधारिका, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त बीड शहर मध्ये भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीद्वारे स्त्री शिक्षण, सामाजिक समता व महिला सक्षमीकरणाचा संदेश देण्यात आला.रॅलीची सुरुवात सकाळी ८.०० वाजता मिलीया हायस्कूल ते बशीर गंज चौक येथून झाली. विविध सामाजिक संस्था, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक, व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सहभागी नागरिकांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले तसेच ''शिक्षण हाच विकासाचा पाया'', ''स्त्री शिक्षण समाज परिवर्तन'' अशा घोषणा दिल्या.

रॅलीदरम्यान प्रेरणादायी फलक, घोषवाक्ये व वेशभूषेद्वारे सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी मान्यवरांनी सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षणासाठीचे योगदान आणि सामाजिक परिवर्तनातील त्यांची भूमिका अधोरेखित केली.या रॅलीमुळे तरुण पिढीला सावित्रीबाई फुले यांच्या विचारांची प्रेरणा मिळाली असून सामाजिक समतेचा संदेश प्रभावीपणे पोहोचल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या सूचनेनुसार तसेच जिल्हा महिला व बालविकास अधिकारी मनोज ससे व जिल्हा बालसंरक्षण अधिकारी मंगेश जाधव यांच्या मार्गदर्शन खाली हा कार्यक्रम घेण्यात आला .या वेळी संरक्षण अधिकारी संतोष पाटील,जिल्हा चाईल्ड हेल्प लाईन च्या अश्विनी जगताप,पर्यवेक्षक स्वप्नील कोकाटे,प्रवीण वीर जिल्हा मिशन समन्व्यक (महिला सक्षमिकरण ) अर्चना वीर, स्वाती झनझने तसेच उपशिक्षणाधिकारी अंजुम शेख गटशिक्षण अधिकारी खान शिक्षण विस्तार अधिकारी मिलिंद तुरुकमारे तसेच बीड येथील मिलिया शाळेचे मुख्याध्यापक चाऊस फैसल आणि इतर ८ शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# माईलस्टोन स्कूलचा फन फेअर ठरला विद्यार्थ्यांसाठी व्यवसायाची शाळा

## १४० स्टॉल, ३.५० लाखांची उलाढाल; ५०० विद्यार्थ्यांनी केला प्रत्यक्ष व्यवहार, विक्री आणि मार्केटिंगचा घेतला अनुभव

बीड । प्रतिनिधी

**आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून, प्रत्यक्ष व्यवहारिक व व्यावसायिक कौशल्यांची जोड आवश्यक आहे. याच विचारातून माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूलच्या वतीने आयोजित करण्यात आलेला वार्षिक फन फेअर व क्रीडा संमेलन हा विद्यार्थ्यांसाठी खऱ्या अर्थाने व्यवसायाची शाळा ठरला. शाळेतील पहिली ते ७ वी च्या विद्यार्थांनी खाद्य पदार्थांचे १४० स्टॉल लावले होते. याला पालकांनी उदंड प्रतिसाद दिल्याने तब्बल ३.५० लाखांची उलाढाल झाली. यामध्ये ५०० विद्यार्थी आणि १ हजार पालक सहभागी झाले होते. विद्यार्थांनी प्रत्यक्ष व्यवहार, विक्री आणि मार्केटिंगचा अनुभव घेतला.**



या फन फेअरमध्ये विद्यार्थ्यांनी उभारलेल्या स्टॉलपैकी झुनका-भाकर, भाजीपाला, विविध फळे, ताजे ज्यूस, दही-धपाटे, पुलाव, पाणीपुरी, क्लोड्रिंक्स तसेच विविध घरगुती पदार्थांना मोठी मागणी होती. या सर्व पदार्थांची तयारी, किंमत ठरवणे, स्टॉल सजावट, ग्राहकांशी संवाद, विक्री व हिशेब ठेवणे ही सर्व कामे विद्यार्थ्यांनी स्वतः पार पाडली. या उपक्रमाला ५०० हून अधिक विद्यार्थी व सुमारे १,००० पालकांनी भेट दिली. पालकांनी प्रत्येक स्टॉलला भेट देत विद्यार्थ्यांनी उभारलेल्या लघुउद्योगांचे कौतुक केले. परिणामी या १४० स्टॉलमधून ३ लाख ५० हजार रुपयांपेक्षा अधिक उलाढाल झाली. यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यवहार, नफा-तोटा, ग्राहक समाधान आणि मार्केटिंगचे धडे अनुभवातून शिकता आले. माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूलच्या वतीने विद्यार्थ्यांना स्टॉल, आवश्यक सुविधा व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले होते. शाळेच्या उत्कृष्ट नियोजनामुळे कुठेही गोंधळ न होता कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साही वातावरणात पार पडला. फन फेअर हा केवळ मनोरंजनाचा उपक्रम न राहता विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात वाढ करणारा आणि उद्योजकतेकडे नेणारा मंच ठरला. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शाळेचे संचालक ज्ञानेश्वर तांबे, नम्रता तांबे, मुख्याध्यापक सारिका जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. समन्वयक रोहिणी गीते, दीक्षा हंबारे, सुषमा गाडे, माधुरी तांबे, अनिता जाधव, अर्चना गोरे, सना शेख, आफरीन शेख, अमोल शिरसागर, स्वाती भांडवलकर, अर्चना जोगदंड, जयश्री राऊत, पुनम वाघमारे, रोहिणी आघाव, मंजुश्री राग, ज्ञानेश्वर जरांगे, अशोक चौरे, प्रियंका पेंढारे, दत्ता काकडे, सत्यजित ठाकूर, वनिता काकडे, अश्विनी काकडे, स्नेहल जोशी, पल्लवी ढाकणे, प्रीती लामतुरे, आशा जाधव, सुमती कासलीवाल, गंगा शेनकुडे, दीक्षा वाघमारे, संघमित्रा गायसमुद्रे, दीपा आगलावे तसेच स्वाती ताई व अयोध्या ताई यांनी विशेष परिश्रम घेतले.

### पालकांच्या प्रोत्साहनातून फन फेअर यशस्वी

पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रत्येक स्टॉलला भेट दिली. विद्यार्थ्यांनी केलेल्या विक्री कौशल्याचे, संवाद पद्धतीचे आणि स्वच्छतेचे पालकांनी विशेष कौतुक केले. केवळ खरेदी न करता विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन दिल्याने हा फन फेअर अधिक अर्थपूर्ण आणि यशस्वी ठरला.

**-ज्ञानेश्वर तांबे, संचालक**





**आष्टी: राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे युवक उप जिल्हाध्यक्ष जि.प सदस्य सतिश आबा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यकर्त्यांनी ऑर्केस्ट्रा चे पंचायत समितीच्या प्रांगणामध्ये आयोजन करण्यात आले होते यावेळी प्रेक्षकांनी मराठ मोळया लावण्यांचा मनमुराद आनंद लुटला..**

## पान १ वरून...

### कृषी योजनांचा निधी

कृषी क्षेत्र अधिक बळकट करण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी केंद्र सरकार राज्यांना सर्वतोपरी सहकार्य करेल, असे आश्वासनही मंत्र्यांनी यावेळी दिले.

---------------

### रेबीज प्रतिबंधक लसीचा

प्रतिबंधात्मक लस आणि इम्युनोग्लोब्युलीनचा साठा कधीही संपणार नाही, याची जबाबदारी संबंधित रुग्णालय व्यवस्थापनावर टाकण्यात आली आहे. राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव आठ आठवड्यांच्या आत या आदेशांच्या अंमलबजावणीचा अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर करणार आहेत. रेबीज हा प्राणघातक आजार असून, वेळेत उपचार न झाल्यास मृत्यूचा धोका असतो. त्यामुळे या निर्देशांची अंमलबजावणी ही सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असल्याचे स्पष्ट केले आहे. महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाने याची दखल घेत शहरात सर्वेक्षण केले. यामध्ये दवाखान्यांसह शाळा, रुग्णालये, रेल्वेस्थानके, बसस्थानके तसेच इतर सार्वजनिक ठिकाणे मिळून ३ हजार ३८७ ठिकाणे आढळून आले आहेत. भटक्या कुत्र्यांच्या वाढता वावर आणि त्यातून होणाऱ्या चाव्यांच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून याचिका दाखल केली होती. या प्रकरणात दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी करण्यासाठी राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने सर्व वैद्यकीय संस्थांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. रुग्णालय परिसर भटक्या कुत्र्यांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक ते कुंपण, भिंत अथवा प्रवेशद्वाराची व्यवस्था करणे बंधनकारक आहे. तसेच परिसरातील स्वच्छता आणि भटक्या प्राण्यांच्या नियंत्रणासाठी प्रत्येक संस्थेने नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, असेही नमूद करण्यात आले आहे. दर तिमाहीत परिसराची तपासणी करून कुत्र्यांचे आश्रयस्थान तयार होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

-------------

### ...तर बिनविरोध उमेदवाराची

मात्र यावर मनसे नेते राज ठाकरे यांनी नाराजी व्यक्त करत थेट न्यायालयामध्ये जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्यातच निवडणूक आयोगाने संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांना निर्देश दिले आहेत की, अविरोध उमेदवार झाला असेल तर त्याची संपूर्ण माहिती आयोगाला कळवली जावी आणि त्यानंतरच घोषणा करावी. आता मात्र या सर्व अविरोध निवडून आलेल्या उमेदवारावर टांगती तलवार दिसत आहे. निवडणुकीमध्ये ईव्हीएम मशीनवर सर्व उमेदवारांचे चिन्ह असतात. या सोबतच नोटा हे देखील पर्याय निवडणूक आयोगाने ठेवले आहे. याचे कारण जर कोणताही उमेदवार पसंत नसेल तर नोटा याला मतदान करता येते आणि निवडणूक आयोगाने ही प्रक्रिया लावलेली असल्यामुळे उमेदवार अन्य नसले आणि एकच उमेदवार असेल तर तो अविरोध कसा. त्यामुळे नागरिकांना तोही नको असेल तर नोटा हा पर्याय असल्याने आयोगाने निर्णय घेतला तर अविरोध आलेल्या उमेदवाराला निवडणूक लढवावी लागेल. मात्र त्याची स्पर्धा ही नोटा बरोबर असेल. कारण असा निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात असून, यावर आयोग विचार विनिमय करत असल्याचे सूत्राकडून समजते.

--------

### विरोधक कोर्टात गेले तरी

म्हणाले की, अनेक अपक्ष आणि मुस्लिम उमेदवारही बिनविरोध निवडून आले आहेत, मग त्याबद्दल विरोधक मौन का बाळगून आहेत? स्वतःचा पराभव समोर दिसत असल्याने विरोधक आतापासूनच सबबी शोधू लागले आहेत. चंद्रपूरचा विकास फक्त भाजप-शिवसेनेनेच केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शहरांच्या विकासासाठी ५० हजार कोटी रुपये मंजूर केले आहेत. चंद्रपूरच्या विकासासाठीही निधी उपलब्ध करून दिला जाईल. मात्र, हे पैसे योग्य रीतीने वापरायचे असतील तर भ्रष्ट लोकांना महानगरपालिकेत निवडून देऊ नका, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

--------------

### सहा कि.मी. पायपीट करूनही

अंत झाला आहे. आलदंडी टोला येथील आशा संतोष किरंगे (वय २४) ही आदिवासी महिला नऊ महिन्यांची गर्भवती होती. गावाला जाण्यासाठी मुख्य रस्त्यापासून दुसरा रस्ता नसल्याने जंगलातील खाचखळगे तुडवत पायवाटेनेच जावे लागते. गावात प्रसूतीची कुठलीही शासकीय सुविधा नाही. त्यामुळे आशा किरंगे आणि तिचा पती संतोष यांनी सहा किलोमीटर अंतरावरील पेठा हे तिच्या बहिणीचे गाव पायी गाठले. परंतु, चालण्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी तिला प्रसववेदना सुरू झाल्या. तिला तत्काळ रुग्णवाहिकेने हेडरी येथील माँ कालीअम्मल इस्पितळात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी सिझर करण्याचा निर्णय घेतला. परंतु, तोपर्यंत पोटातच बाळ दगावले होते. काही वेळाने वाढलेल्या रक्तदाबामुळे आशानेही प्राण सोडला. त्यानंतर मृतदेह विच्छेदनासाठी एटापल्ली येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. परंतु, तेथे स्त्रीरोग तज्ज्ञ नसल्याने पुन्हा ४० किलोमीटरवरील अहेरी येथे पाठविण्यात आले. त्यानंतर तिचे शवविच्छेदन करण्यात आले.

---------------

### मावळ मधील सोएक्स इंडिया कंपनीवर

हुक्का प्रॉडक्ट्स, कच्चे पदार्थ आणि फ्लेवर्सचा साठा जप्त करून कंपनीच्या दारांना सील ठोकले आहे.अनिल कुमार चौहान (असिस्टंट मॅनेजर), असिफ फाजलानी (संचालक), फैजल फाजलानी (संचालक), मे. सोएक्स इंडिया प्रा. ली. (कंपनी) या व्यक्तींविरुद्ध पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३(५), १२३, २२३, २७४, २७५ आणि अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ च्या विविध कलमांनुसार (कलम ३०, २६, २७, ५९) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---------------

### देवाभाऊ मुख्यमंत्री आहे, तोपर्यंत लाडकी बहीण

लहान महापालिकांचा ३० टक्के हिस्सा राज्य सरकार भरणार आहे. त्यामुळे आर्थिक अडचणींमुळे विकास कामे रखडलेल्या महापालिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. सभेत बोलताना त्यांनी सांगितले की, महाराष्ट्र हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे नागरीकरण झालेले राज्य असून, या निवडणुकीचा थेट परिणाम शहरी नागरिकांच्या जीवनावर होणार आहे. याआधीच्या सरकारांनी शहरांकडे दुर्लक्ष केल्याने झोपडपट्ट्या, कचरा, नाल्या आणि दुर्गंधी अशा समस्या निर्माण झाल्या. मात्र, २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार आल्यानंतर शहरांसाठी विशेष योजना सुरू झाल्या आणि लाखो कोटींचा निधी देण्यात आला, असेही त्यांनी सांगितले.

---------

### महायुती सरकारवर

उमेदवारांची पळवा-पळवी सुरू असल्याचे ते म्हणाले. विधानसभा अध्यक्ष हे कोणत्याही पक्षाचे नसतात, राहुल नार्वेकर यांच्याकडे निपक्षपातीपणा नाही. त्यांना तत्काळ निलंबित करावे. त्याच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली. निवडणुकीमध्ये दमदाटी सुरू असल्याचा आरोप देखील त्यांनी केला. काही ठिकाणी निवडणूक बिनविरोध करून मतदारांचा हक्क हिरावला आहे. निवडणूक आयोगाने अशा ठिकाणची निवडणूक प्रक्रिया रद्द करून पुन्हा निवडणूक घ्यावी, अशी मागणी ठाकरे यांनी केली. मी सत्तेत असताना मराठी सक्तीची केली, तो आदेश महायुती सरकाने रद्द केला. हिंदू धोक्यात आला आहे, हा १० वर्षातील परिपाक आहे. आम्ही हिंदी नाही, हिंदू आहोत. पंतप्रधान मोदी १० वर्ष सत्तेत असताना हिंदू संकटात कसा? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. पत्रकार परिषदेच्या सुरूवातीला बोलताना राज ठाकरे म्हणाले की, मला २० वर्षानंतर जेलमधून सुटून आल्यासारख वाटत आहे. नवीन शिवसेना भवन पहिल्यांदाच पाहत आहे. जुन्या शिवसेना भवनातील आठवणी रोमांचक असल्याचे त्यांनी सांगितले. भाजपला सत्तेतून बाहेर येणार नाही, असा भ्रम असेल तर तो दूर करावा. सत्तेचा ताम्रपट घेऊन कोणी जन्माला आलेले नाही. पश्चिम बंगालमध्ये बिनविरोध निवडणुकीला भाजपने विरोध केला होता, आता राज्यात ज्या जागा बिनविरोध झाल्या आहेत, त्यावर भाजपने आपली प्रतिक्रिया द्यावी. सत्ताधाऱ्यांनी नवीन पायंडा पाडू नये, असे राज ठाकरे म्हणाले.

------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. ०५ जानेवारी २०२६


## थोडक्यात



### सावित्रीच्या लेकीचा सन्मान करणे काळाची गरज –केशव बादाडे

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय जन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, आदर्श गुरुकुल माजलगाव दि.३ जानेवारी शनिवार रोजी अत्यंत आनंदोत्सवात बालिका दिन व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंच प्रतिमा पूजन करून अभिवादन केले. प्रास्ताविक ज्ञानराज घाडगे यांनी केले. पाहुण्यांचा सत्कार पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. कार्यक्रमास मार्गदर्शक केशव बादाडे हे सावित्रीच्या लेकींचा या काळात छळ ,दुष्कृत्य अत्याचार होत आहेत ते न होता त्यांचा सन्मान व्हायला पाहिजे असे उद्गारले. प्रमुख पाहुण्या सुनिता लोणकर,सावित्री बादाडे, प्रियंका घाडगे, अंजली घाडगे यांनी आपल्या मनोगतातून अभिवादन केले. सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा धारण करून सारिका टेकाळेने भाषण केले. विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुलेच्या संघर्षमय जीवनावर आधारित भाषणे, गीत गायन सादर केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भारत घाडगे,दत्तात्रय माने, सुशांत लोणकर, ओमकार बादाडे, स्वरूपा बादाडे यांनी परिश्रम घेतले.सूत्रसंचालन शिवम शेजुळने तर उपस्थित्यांचे आभार ऋषिकेश फपाळने मानले.



### दलितमित्र एकबाल पेंटर फाउंडेशनच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथे जि.प. कन्या शाळा मध्ये माई सावित्रीबाई फुले यांची जयंती गेल्या ३५ वर्षापासून दलित मित्र एकबाल पेंटर हे स्वतः स्वखर्चाने दरवर्षी करत असतात. त्याच पद्धतीने यावर्षी अनेक शाळेतील विद्यार्थ्यांचे भाषण वकृत्व स्पर्धा व समाजामध्ये काम करणारे सामाजिक कार्यकर्ते यांना पुरस्कार देण्यात येतो. यावर्षीचा पुरस्कार प्रा. मोहन परजणे सर यांना देण्यात आला. दलितमित्र एकबाल पेंटर फाउंडेशन च्या वतीने अनेक उपक्रम प्रत्येक वर्षी घेतले जातात. यामध्येच सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने

मुला- मुलींचे भाषण स्पर्धेमध्ये अनेक मुलींना स्पर्धेचे बक्षीस म्हणून महापुरुषांची पुस्तके व त्यांना स्टेज करिअर मिळण्यासाठी ही स्पर्धा दरवर्षी आयोजित करण्यात येते. या कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती प्रा.मोहन परजणे सर यांनी आपल्या मनोगतमध्ये मुलींनी सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घेतला पाहिजे असे सांगितले, गणेश कवडे यांनी बोलतांना सांगितले की, मराठी शाळेबरोबरच उर्दू शाळेच्या मुलींनी पण भाषणामध्ये जास्तीत जास्त सहभाग नोंदवल्या बद्दल कौतुक केले. एल आर जाधव सर बोलतांना सांगितले की, एकबाल पेंटर हे पाटोद्याचे भूषण आहे. दरवर्षी जयंती साजरी करतात त्यांचाआदर्श सर्वांनी घ्यावा, भाई विष्णुपंत घोलप यांनी सांगितले की,सावित्रीबाई फुले यांची जयंती आली की, आम्हाला पेंटर साहेबांची आठवण येते. कॉ. महादेव नागरगोजे, जाहेर पाटील, भाई विष्णुपंत घोलप ,एल.आर. जाधव , गणेश कवडे, हरीभगत सर, दिलीपराव गाडे, भगवानराव जावळे ,देमा जावळे , काळूशे सर, सय्यद इलियास ,हादीसर,मुकरम बेग, नजान सर, खेडकर मॅडम,समिना बाजी,जबीन बाजी,तब्सुम बाजी,रफत बाजी,शेख फय्याज, सय्यद ईशरत, जावळे बाई, डिडुळ बाई ,बुद्रुक बाई , साठे, पारवे,सय्यद रेहान, सय्यद इम्रान,तसेच जिल्हा परिषद कन्या शाळेतील शिक्षक शिक्षिका व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. विद्यार्थ्यांचे बक्षीस वितरण नंतर शेवटी सर्वांचे आभार सज्जाद सय्यद यांनी केले.

# कृषी प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद; ४ दिवसांत ८० हजार शेतकऱ्यांची हजेरी

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई येथे सुरु असलेल्या पाच दिवसीय राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाला चौथ्या दिवशीही शेतकरी, युवक व नागरिकांची विक्रमी गर्दी पाहायला मिळाली. सोमवार, दिनांक ५ जानेवारीपर्यंत सुरु असलेल्या या प्रदर्शनाने परिसरात कृषी नवसंजीवनी निर्माण केली असून, शेतीकडे आधुनिक दृष्टीने पाहण्याची संधी शेतकऱ्यांना मिळत आहे. रविवारपर्यंत या कृषी प्रदर्शनाला तब्बल ८० हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी भेट देत आधुनिक शेतीविषयक माहिती, नव्या संकल्पना व तंत्रज्ञानाची माहिती घेतली आहे. दरम्यान आज ११ प्रयोगशील शेतकऱ्यांचा कृषीरत्न पुरस्कार प्रदान करुन गौरव करण्यात येणार आहे, यानंतर कृषी प्रदर्शनाचा समारोप होणार आहे.





किसान कृषी प्रतिष्ठानच्या वतीने गेवराई येथे गेल्या १८ वर्षांपासून सातत्याने या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येत असून, हे प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक, ज्ञानवर्धक व दिशादर्शक ठरत आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, लघु व मध्यम शेतकरी, युवक व महिला शेतकरी यांना डोळ्यासमोर ठेवून या प्रदर्शनाची रचना करण्यात आली आहे.

यंदाच्या प्रदर्शनात शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरणाऱ्या २२० हून अधिक नामांकित कंपन्यांचे स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. या स्टॉल्सवर आधुनिक शेती यंत्रसामग्री ट्रॅक्टर व अवजारे, उच्च प्रतीची बी-बियाणे, खते व कीडनाशके ड्रिप व स्प्रिंकलर सिंचन प्रणाली, सोलर पंप, डिजिटल शेती व स्मार्ट शेती संकल्पना, शेतमाल प्रक्रिया व मूल्यवर्धन यांची सविस्तर माहिती शेतकऱ्यांना दिली जात आहे.

प्रदर्शनात उपस्थित कृषी तज्ज्ञ, कंपनी प्रतिनिधी व मार्गदर्शक शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत पीक उत्पादन कसे वाढवावे, कमी खर्चात जास्त उत्पन्न कसे मिळवावे, पाणी व्यवस्थापनाचे आधुनिक उपाय कीड व रोग नियंत्रण, हवामान बदलानुसार शेती नियोजन, बाजारपेठेतील संधी व थेट विक्रीचे पर्याय

याबाबत सखोल व प्रात्यक्षिक स्वरूपात मार्गदर्शन करत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रत्यक्ष पाहून, समजून घेण्याची मोठी संधी मिळत आहे. या कृषी प्रदर्शनाला बीड जिल्ह्यासह जालना, हिंगोली, परभणी, छत्रपती संभाजीनगर आदी जिल्ह्यांतील हजारो शेतकरी दररोज भेट देत असून, शेतीतील नवनवीन प्रयोग, तंत्रज्ञान व व्यवसायाच्या संधी जाणून घेत आहेत. अनेक शेतकऱ्यांनी येथेच आवश्यक अवजारे, बी-बियाणे व उपकरणांची खरेदी केल्याचेही चित्र आहे. ग्रामीण शेतकऱ्यांसाठी उपयुक्त माहिती, आधुनिक तंत्रज्ञान व मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्याबद्दल आयोजक महेश बेदरे यांचे शेतकरी वर्गाकडून विशेष आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

**११ प्रयोगशील शेतकऱ्यांचा आज गौरव; कृषी प्रदर्शनाचा होणार समारोप**

किसान कृषी विकास प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी ११ प्रयोगशील व प्रगतशील शेतकऱ्यांना 'कृषिरत्न पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येते. आजपर्यंत या प्रतिष्ठानमार्फत १७७ शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला असून, या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना नवी प्रेरणा मिळत आहे. दरम्यान यावर्षीचा कृषिरत्न पुरस्कार वितरण व राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचा समारोप सोहळा आज सोमवार, दिनांक ५ जानेवारी रोजी दुपारी १२.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. या वर्षीचे कृषीरत्न पुरस्कार हे अतुल महादेव तळेकर (मादळमोही), अमोल भास्करराव जोशी ता.गेवराई, शामसुंदर उद्धवराव फलके (राहेरी), मदन नारायणराव शिंदे (मन्यारवाडी), नंदकुमार दादासाहेब पोळं (मानमोडी), सौ.जयश्री वाल्मीक गर्जे (राजुरी मळा, तलवाडा), अमोल पांडुरंग ढोरमारे (खापर पांगरी), राजाभाऊ किसन औटी (सुशी वडगाव), गंगाराम शांताराम जाधव (कोल्हेर), आत्माराम गिन्यानदेव राठोड (पोईतांडा) यांना जाहीर झाले असून मराठा आंदोलनाचे संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील, माजी मंत्री अशोक पाटील, गेवराईचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित, छत्रपती संभाजीनगर विभागाचे कृषी उपसंचालक वानखडे साहेब, बीड जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष राहुल सोनवणे, कॉंग्रेस सरचिटणीस आदित्य दादा पाटील यांच्या हस्ते या ११ शेतकऱ्यांना 'कृषिरत्न पुरस्कार' प्रदान करून विशेष गौरविण्यात येणार आहे. तरी या पुरस्कार वितरण व समारोप कार्यक्रमास शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजक महेश बेदरे आणि पुरस्कार वितरण समिती प्रमुख राजेंद्र आतकरे यांनी केले आहे.

## संताची सेवा केली की आशिर्वाद नक्की मिळतो ह.भ.प. स्वामी योगीराज महाराज रामगडकर

बीड । प्रतिनिधी

गोरक्षनाथ टेकडी हि नाथांची तपोभूमी आहे या ठिकाणी गोरक्षनाथ महाराज, साधू बाबा महाराज, गुरूवर्य सद्‌गुरू किसान बाबा महाराज, यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या व गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या तपाने पुनीत झालेली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी हि संत भूमी आहे संताची सेवा केली की आशिर्वाद नक्की मिळतो असे अभंग विवेचन ह भ प स्वामी योगीराज महाराज यांनी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे पौष महिन्यातील पौर्णिमे निम्मित कीर्तन सेवेत संपन्न करताना व्यक्त केले



**श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे १३ जानेवारी मंगळवार रोजी धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला आहे**

पौष महिन्यातील पौर्णिमा पंगत की गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या जन्म भूमी काळेगाव हवेली येथील ग्रामस्थांची होती.अभंग विवेचन करताना ह भ प स्वामी योगीराज महाराज रामगडकर यांनी सांगितले की संताचा जन्म जन सामन्याचे दुःख कमी करण्यासाठी झालेला असतो संत हे कल्पवृषा प्रमाणे असतात झाड हे झाड लावणारा व झाड तोडणारा यांच्यात भेद करत नाही सर्वांना सावली देतात तस संत सर्वांना सुख देतात संत कल्पतरू वृक्षा प्रमाणे आहे.

बीड हि संताची भूमी आहे.संत नगद नारायण महाराज संत बँकटस्वामी महाराज, संत राम बाबा महाराज, संत वामन भाऊ महाराज, संत माऊली दादा, संत सद्‌गुरू किसान बाबा महाराज, शांती ब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या तपाने अनेक दुःखी जनाचे जीवनाचे कल्याण झाले. तुम्हालाही तुमच्या जीवनाचे कल्याण करायचे असेल तर संत सेवा हीच जीवनच कल्याण करू शकते असे अभंग विवेचनात ह भ प स्वामी योगीराज महाराज रामगडकर यांनी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे पौर्णिमा निम्मित संत किसानबाबा महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आयोजित पौर्णिमा निम्मित कीर्तन सेवेत व्यक्त केले या वेळी पंचक्रोशीतील टाळकरी, भजनी मंडळी, गायनाचार्य, भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते

पान ६ वरुन...

### ऑनलाइन जुगार

सहायक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार सतीश कांगणे, पोलीस हवालदार घोळवे, शेख आणि पोलीस अंमलदार नागरगोजे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या प्रकरणी पोलीस अंमलदार सतीश श्रीराम कांगणे यांच्या फिर्यादीवरून परवेज शेख मोईज, मोहीद रशीद खान, वाजेद सय्यद आणि आसिफ पठाण यांच्या विरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम १२ (अ) नुसार अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### वडवणी तालुक्यातील ऊसतोड

जबाबदारी त्यामुळे वाढलेला खर्च गावाकडे राहून भागत नव्हता. गावाकडील पत्राच्या शेडमध्ये गुजरान करणाऱ्या कुटुंबाला आर्थिक नाजूक परिस्थितीशी झुंज द्यावी लागत होती. त्यामुळे आपल्या कुटुंबातील आर्थिक गरजा भागविण्यासाठी गणेश आणि अश्विनी यांनी मुंगळा ट्रॅक्टर द्वारे ऊस तोडणी सुरू केली. मागील काही वर्षांपासून ही जोडी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन ऊस तोडणी करीत होती. यावर्षी लातूर जिल्ह्यातील साखर कारखान्यावर हे दांपत्य चिमुकल्या लेकरांसह ऊस तोडणी करीत होते. शनिवारी दुपारच्या वेळेला आपलं ट्रॅक्टर भरून ते साखर कारखान्यावर माप होण्याच्या प्रतीक्षेत थांबले होते. त्याचवेळी एक ट्रॅक्टर जवळून जात असताना गणेश यांच्या अंगावर कोसळलं. त्यात गणेश जागीच ठार झाला. तर आणखी एक जण जखमी झाला. काही क्षणात होत्याच नव्हतं झालं. पत्नी अश्विनीच्या डोळ्यासमोर ही घटना घडल्यामुळे तिच्यावर आभाळ कोसळलं. गणेशच्या मृत्यूची खबर काही क्षणात सोशल मीडियावर बीड जिल्ह्यात पोचली. संपूर्ण बीड जिल्हा अक्षरशः हळूहळून गेला.

हसतं-खेळतं कुटुंब..आणि एका क्षणात सगळं संपल..

अश्विनी आणि गणेश डोंगरे हे दांपत्य रिलस्टार होतं. ऊस तोडणी करून जगत असलं तरी मोठ्या आनंदाने सोशल मीडियावर व्हिडिओ शेअर करून आलेल्या परिस्थितीशी ते तोंड देत होतं. गणेशचा अपघात झाला त्यावेळी अश्विनी सोशल मीडियावर लाईव्ह होती. लाईव्ह असतानाच ही ट्राली पतीच्या अंगावर पडली. एक हसतं-खेळतं कुटुंब.आणि एका क्षणात सगळं संपल.

अजितदादांनी तत्काळ मदत करावी

लातूर जिल्ह्यातील अपघातग्रस्त ठिकाणचा कारखाना महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार चालवतात अशी माहिती मिळाली आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील पालकत्व असलेल्या अजीतदादांनी एका ऊसतोड मजुराच्या मृत्यूमुळे तीन चिमुकल्या बालकांसह त्याची पत्नी आणि आई वडील अनाथ झाले आहेत. या परिवाराचे पालकत्व अजित दादांनी स्वीकारावं आणि या कुटुंबाला घर बांधकाम करून द्यावं तसेच लेकरांना आधार द्यावा अशा पद्धतीची मागणी या भागातील नागरिकांकडून होत आहे.

### शेळी-बोकुड चोरण्याची

घालून शेळ्यांची चोरी करणाऱ्या टोळीचा तपास करून त्यांना जेरबंद करावे अशी मागणी आष्टी शहरातील आझाद नगरचे नागरिक करू लागले आहे शहरांमध्ये मुख्य चौकामध्ये सीसीटीव्हीची नजर शहरावर असून देखील मागच्या काळात काही मोटरसायकल देखील भर चौकातून चोरी गेल्याचे प्रकार घडले आहे असेच काही आता शेळ्या चोरणारी टोळी सक्रिय झाली आहे या टोळीचा शोध करावा. आष्टीचे पीआय भुतेकर यांनी यामध्ये लक्ष घालून गोरगरिबांची होत असलेली नुकसान थांबावी.

### बसस्टँडवर न जाता बस

व त्यांच्या चालक वाहकावर गावातून बस का नेली नाही असा ठपका ठेवून कारवाई केली सदर कारवाई महाराष्ट्र राज्याच्या विशेष मोहीम पथकातील पथक प्रमुख श्री राहुल मुळे व राजकुमार नागरगोजे व कांबळे यांच्यासह जीभ चालक राजेश पवार या संयुक्त पथकाने केली सदर या कारवाईमुळे चालक वाहकात घाबरवटे वातावरण झाले असून इथून पुढे तरी महामंडळाच्या बस चालकाने या दोन्ही गावातून वाहने बिना तक्रारी नुसार मार्गस्थ करावे अशी सुज्ञान प्रवाशांकडून मागणी करण्यात येत आहे.

### संत वामनभाऊ महाराजांचा

असून दैनंदिन अखंड कीर्तनसेवा सुरू असणार आहे.

हा सप्ताह १० तारखेपर्यंत चालणार असून समारोपाच्या दिवशी राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. श्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या कालावधीत महाराष्ट्रासह विविध भागांतून लाखो भाविक गहिनीनाथ गड येथे दर्शनासाठी उपस्थित राहणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला असून, संत वामनभाऊ महाराजांच्या विचारांचा आणि भक्तीमार्गाचा जागर या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त मोठ्या श्रद्धेने साजरा केला जात आहे.

## योगेश्वरी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांचे हिवाळी परीक्षेत यश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक मधील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या हिवाळी परीक्षा - २०२५ मध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. यामध्ये तृतीय वर्ष संगणक अभियांत्रिकी मध्ये शिकणाऱ्या चि. प्रबल तिवारी (९५.८८%) , कु. विशाखा तिडके (९५.५३%) व श्रुतिका सूर्यवंशी (९५.४१%) टक्के गुण सर्वप्रथम प्रथम वर्ष कल्याणी बोळके, पूनम मुंडे, लक्ष्मी मुंडे, पंकजा फड, समृद्धी यादव, सायली मोरे, अभय सावंत, प्राची भोसले, समीर शेख, अखिल चौधरी या विद्यार्थ्यांनी गणित विषयात शंभर पैकी शंभर गुण संपादित करून, राज्यात सर्वप्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे. या विद्यार्थ्यांना गणित विषयासाठी प्रा.नारायण सिरसाट यांचे मार्गदर्शन लाभले. त्याच बरोबर स्ट्रेंथ ऑफ मटेरियल या विषयात चि.वेदांत जोशी याने शंभर पैकी शंभर गुण मिळवले आहेत. या विद्यार्थ्यांला प्रा.काझी झेड.पी.यांचे मार्गदर्शन लाभले या उत्तुंग यशामुळे योगेश्वरी पॉलिटेक्निक तंत्रशिक्षणामध्ये राज्यात अग्रेसर असल्याचे सिद्ध झाले आहे. योगेश्वरी पॉलिटेक्निक मधील विद्यार्थ्यांनी सातत्याने गुणवत्ता सिद्ध करत महाराष्ट्रात सर्वप्रथम येण्याचा बहुमान कायम ठेवला आहे.



या निकालामध्ये प्रथम वर्ष संगणक अभियांत्रिकी पदविका वर्गातून कु.दांड अस्मिता, (९१.०६%) कु.शिंदे साक्षी, (९१.०६%) कु. यादव समृद्धी (९१.०६%) प्रथम,बोळके कल्याणी (९१.२९%) द्वितीय., मुंडे पूनम (९०.१२ %) तृतीय,द्वितीय वर्ष संगणक अभियांत्रिकी पदविका वर्गातून स्वामी सिवंजली (८५.४१ %) प्रथम,देशमुख सायली (८३.८८%) द्वितीय, देशमुख धनश्री (८३.२९ %) तृतीय.तृतीय वर्ष संगणक अभियांत्रिकी विभागातून प्रबल तिवारी (९५.८८%) प्रथम,विशाखा तिडके (९५.५३%) द्वितीय, श्रुतिका सूर्यवंशी (९५.४१%) तृतीय.प्रथम वर्ष यंत्र अभियांत्रिकी वर्गातून मोरे सायली (९१.७१%) प्रथम, कांबळे संचिता (९१.२९ %) द्वितीय, वायसे ओम (८९.०६ %), तृतीय,द्वितीय वर्ष यंत्र अभियांत्रिकी पदविका वर्गातून,शेख मुस्कान (८६.००%) प्रथम, अकुस्कर पायल (८५.४४%) द्वितीय, होळकर स्वाती (८४.००%) तृतीय, तृतीय वर्ष यंत्र अभियांत्रिकी वर्गातून हारे अश्विनी (९४.१२%) प्रथम, राऊत रोहिणी (९३.०६%)द्वितीय, चौघुले निलेश (८८.५९%) तृतीय.प्रथम वर्ष स्थापत्य अभियांत्रिकी पदविका वर्गातून फड पंकजा (८९.६५%) प्रथम, यादव साक्षी (८९.५३%)द्वितीय, लोमटे समर्थ (८९.२९%), तृतीय, द्वितीय वर्ष स्थापत्य अभियांत्रिकी पदविका वर्गातून बडे सौदागर (९४.९४%) प्रथम, जोशी वेदांत (९४.३५%) द्वितीय, पांचाळ ऋतुजा (९१.८८%) तृतीय वर्ष स्थापत्य अभियांत्रिकी पदविका वर्गातून मुळे हर्ष (९४.११%). प्रथम, सस्ते तेजस्विनी (९३.५६%) द्वितीय, पवार सुश्मिता (९०.७८%) तृतीय. प्रथम वर्ष स्वयंचलित अभियांत्रिकी वर्गातून शेख समीर (९२.७१%) प्रथम,चव्हाण श्रद्धा (८८.३५%) द्वितीय, चौधरी आखिल तृतीय, द्वितीय वर्ष स्वयंचलित अभियांत्रिकी वर्गातून समीना शेख (८६.००%) प्रथम, सानिका कुलकर्णी (७९.५० %) द्वितीय, कुलकर्णी मधुसुधन (७७.२५%) तृतीय, तृतीय वर्ष स्वयंचलित अभियांत्रिकी वर्गातून पार्थ वेदपाठक (९०.८२%) व रोहन जाधव (९०.८२%) प्रथम, साक्षी सरवदे (८८.३५%) द्वितीय, नीरज जोगदंड (८७.७७%) तृतीय क्रमांक घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या यशासाठी विभागप्रमुख प्रा.रोहित कदम, प्रा.नारायण सिरसाट, प्रा.अतुल फड, प्रा.श्याम गडदे प्रा. बप्पासाहेब सोनवणे व सर्व शिक्षकीय कर्मचा-यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, उपाध्यक्ष गणपत व्यास,कार्यकारी उपाध्यक्ष ॲड.जगदीश चौसाळकर,सचिव कमलाकर चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ.शैलेश वैद्य,संचालक प्रताप पवार, प्राचार्य रमण देशपांडे यांनी अभिनंदन केले आहे.

## पाटोद्यात भरारी पथकाकडून कृषी केंद्राची तपासणी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यामध्ये युरिया या खताची जादा दराने विक्री होत असल्याने दैनिक लोकतंत्र मध्ये बातमी प्रसिद्ध होताच या बातमीच्या अनुषंगाने बीडच्या भरारी पथकाने तालुक्यातील कृषी निविष्ठा विक्री केंद्राला भेटी देऊन जादा भावाने विक्री करु नये अशा सूचना देत काही सेवा केंद्राला नोटीस देण्यात आल्या.

पाटोदा तालुक्यातील कृषी केंद्रात युरीया जादा भावाने विक्री चालू अशी बातमी प्रसिद्ध होताच जिल्हा कृषी अधिकारी व उपविभागीय कृषी अधिकारी यांनी बातमीची दखल घेत तालुक्यातील कृषी निविष्ठा विक्री केंद्र यांची तपासणी कृषी विभागाच्या भरारी पथका मार्फत करण्यात आली यावेळी सर्व दुकानदारांना व युरिया व खते एमआरपी घरात व लिंकिंग न करता विक्री करणे विषयी सक्त सूचना देण्यात आल्या तपासणी दरम्यान काही कृषी सेवा केंद्रांच्या दुकानदारांना नोटीस देण्यात आल्या युरिया खताची जागा दराने विक्री झाल्यास आपल्या खत विक्री परवान्यावर कार्यवाही करण्यात येईल अशी तंबी सर्व दुकानदारांना देण्यात आली तसेच सर्व शेतकरी बांधवांना आवाहन करण्यात येते की अशाप्रकारे कोठे अनुचित प्रकार घडत असल्यास त्वरित कृषी विभागाशी संपर्क साधावा असे कृषी गुणनियंत्रण अधिकारी यांनी म्हटले.

# आ.प्रकाश सोळंकेंचा पुन्हा एकदा वडवणीकरांना झोळी भरुन निधी

**वडवणीतील सीसीटीव्हीसाठी ३ कोटी तर चिंचवणच्या तीन मंदिरांसाठी ९ कोटींचा निधी, नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांनी दिली माहिती**

वडवणी । प्रतिनिधी

बोले तैसा चाले, त्यांची वंदावी पावले. याच उक्तीप्रमाणे वडवणीकरांसाठी माजलगांव विधानसभा मतदारसंघाचे विकासप्रिय आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी वडवणीकरांना प्रत्येक वेळी दिलेल्या शब्दाप्रमाणे आपली कृती प्रत्यक्षात उतरवलेली आहे. आपला कामाचा माणूस याप्रमाणे प्रकाशदादांनी पुन्हा एकदा वडवणीकरांना अक्षरशः झोळी भरुन निधी दिला असून सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ योजनेंतर्गत वडवणीतील सीसीटीव्ही बसविण्यासाठी ३ कोटी तर चिंचवणच्या तीन मंदिरांच्या जिर्णोध्दारासाठी ९ कोटींचा निधी असा एकूण तब्बल १२ कोटी रुपयांचा निधी देण्यास अंतिम प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून या माध्यमातून आ.प्रकाश सोळंकेंचे आपल्या मतदारसंघातील वडवणीवर पुन्हा विशेष प्रेम दिसून आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, माजलगांव विधानसभा मतदारसंघाचे विकासप्रिय आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या माध्यमातून सध्या वडवणी शहरासह तालुक्याचा चौफेर विकास दृष्टीक्षेपास पडत असून विविध नवनविन विकास कामांमुळे वडवणीचे रुपडे पालटताना दिसून येत आहे. तालुक्यातील जनता या विकास कामांवर समाधानी असून यामुळे आपल्या शब्दाचे पक्के असणाऱ्या प्रकाशदादांना वडवणीकर धन्यवाद देत आहेत. वडवणी येथील एका कार्यक्रमामध्ये वडवणी शहराचे नगराध्यक्ष शेषेराव बाप्पु जगताप यांनी स्वतः आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या समक्ष उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे वडवणी शहराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्यासाठी २ कोटी रुपयांचा निधी देण्यात यावा, तसेच वडवणी शहरात सध्या अत्यंत आकर्षक अशा बांधकाम सुरु असणाऱ्या नविन नगरपंचायत प्रशासकीय इमारतीच्या



बांधकामासाठी कमी पडत असलेल्या उर्वरित कामासाठी २ कोटी रुपयांचा निधी देण्यात यावा अशी आग्रही मागणी केली होती. त्यांच्या याच मागणीची आता पूर्तता झालेली असून नुकतेच सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ योजनेंतर्गत वडवणी तालुक्यामध्ये विविध ठिकाणी सीसीटीव्ही आस्थापित करणे यासाठी तब्बल ३ कोटींचा निधी तसेच चिंचवण येथील जगदंबा मंदिर जिर्णोध्दारासाठी ३ कोटी २८ लक्ष ८४ हजार रुपये निधी व चिंचवण येथीलच महादेव व विठ्ठल रुक्मिणी मंदिर जिर्णोध्दारासाठी ५ कोटी १५ लक्ष ५० हजार रुपयांचा निधी अशाप्रकारे चिंचवण येथील तिन्ही मंदिरांच्या जिर्णोध्दारासाठी तब्बल एकूण ८ कोटी ४४ लक्ष ३५ हजार रुपयांचा निधी व दोन्ही कामांसाठी एकूण तब्बल १२ कोटी रुपयांचा निधी देण्यास अंतिम प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे वडवणी नगरपंचायतीच्या बांधकाम सुरु असलेल्या नव्या प्रशासकीय इमारतीच्या उर्वरित कामांसाठीही उर्वरित १ कोटी रुपयांचा निधी लवकरच मिळणार आहे. तसेच आता वडवणी शहराच्या वैभवात आणखी भर घालण्यासाठी व नागरिकांच्या सोयीसाठी शहरातील मुख्य रोडवरवरील दुभाजकांमध्ये ठिकठिकाणी हायमास्ट स्ट्रीट लाईट पथदिवे बसविण्यासाठी आवश्यक असणारा कोट्यावधी रुपयांचा निधीही लवकरच वडवणी शहरासाठी देणार असल्याचा शब्दही आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी दिला असल्याची माहिती वडवणी नगरीचे नगराध्यक्ष शेषेराव बाप्पु जगताप यांनी दिली आहे. दरम्यान बोले तैसा चाले त्यांची वंदावी



पावले याच उक्तीप्रमाणे वडवणीकरांसाठी माजलगांव विधानसभा मतदारसंघाचे विकासप्रिय आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी वडवणीकरांना प्रत्येक वेळी दिलेल्या शब्दाप्रमाणे आपली कृती प्रत्यक्षात उतरवलेली आहे. आपला हक्काचा आणि कामाचा माणूस याप्रमाणे प्रकाशदादांनी पुन्हा एकदा वडवणीकरांना अक्षरशः झोळी भरुन निधी दिला आहे. वडवणीकरही प्रकाश दादांप्रती कृतज्ञता व्यक्त करतांना दिसून येत आहेत.






# सांगलीतील पुराचे पाणी दुष्काळी भागांना देणार - फडणवीस

सांगली : सांगली, मिरज, कुपवाड महापालिकेसाठी विविध योजनांसाठी भरपूर निधी दिला आहे. महापालिकेत पूर्ण बहुमताने सत्ता आणा, पैशांची कमतरता राहणार नाही,'' अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. महापुराच्या संकटापासून मुक्तीसाठी जागतिक बँकेच्या मदतीने चार हजार कोटींचा प्लॅन केला आहे.

पहिल्या टप्प्यात ५९१ कोटी रुपये देऊन प्रकल्पाला सुरुवात करणार आहे. सांगलीतील पुराचे पाणी पश्चिम महाराष्ट्रातील व मराठवाड्यातील दुष्काळी भागांना दिले जाणार असून दुष्काळ मिटवणार असल्याचेही त्यांनी सांगितले. सांगली, मिरज, कुपवाड महापालिकेच्या निवडणुकीच्या प्रचाराचा प्रारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शनिवारी (ता. ३) झाला. त्याप्रसंगी ते बोलत होते. या वेळी आमदार सुधीर गाडगीळ, आमदार सुरेश खाडे, आमदार सत्यजित देशमुख, आमदार अतुल भोसले यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, उमेदवार उपस्थित होते. फडणवीस म्हणाले, ''अनेक लोकांच्या



हाती महापालिका होती, पण विकास झाला नाही. मी मागे सांगलीत आलो होतो, त्या वेळी आमच्या हाती महापालिका द्या असे सांगितले होते. त्या वेळी आमच्याकडे महापालिका आली. जी आश्वासने दिली होती, ती आश्वासने पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. कोल्हापूर, सांगलीला महापुराचा फटका बसतो. महापुराच्या संकटापासून मुक्तीसाठी जागतिक बँकेच्या मदतीने चार हजार कोटींचा प्लॅन तयार केला आहे. पहिल्या टप्प्यात ५९१ कोटी उपलब्ध करून दिले आहेत. पुराचे पाणी हे पश्चिम महाराष्ट्र मराठवाड्यातील दुष्काळी भागाला देण्याचे नियोजन आहे. त्यामुळे दुष्काळी भागातील शेतीला पाणी मिळाल्याने दुष्काळ संपण्यास मदत होईल. ते पुढे म्हणाले, की सत्तर वर्षांत एकच भूमिका होती ती म्हणजे गावाचा विकास म्हणजे देशाचा विकास ही भूमिका सत्तर वर्षांत होती. ही भूमिका खरी आहे. पण शहरे वाढत आहेत. आज शहराच्या गरजा वाढल्या आहेत. शहराचा विकास झाला पाहिजे. सांगलीतही आयटी पार्क उभारण्याचा मानस आहे. त्यामुळे सांगलीतील युवकांना याचा फायदा होईल. सांगलीच्या वारणा उद्भव पाणी योजनेच्या ४५४ कोटींच्या प्रस्तावाला मान्यता देणार आहे. सांगली महापालिकेसाठी १०० कोटींचे रस्ते, १०५ कोटींच्या पाणी योजना २५३ कोटींची ड्रेनेज योजना, ८९ कोटींचा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, शहरातील एलईडी लाइटसाठी ६० कोटी, शंभर फुटी रस्ता व काळी खण विकासासाठी ३ कोटी दिले. महापालिकेत सत्ता आली, की महापालिकेच्या कार्यालयासाठी नवीन इमारत देऊ.

## शेतकऱ्यांनो, खोट्या संदेशांपासून सावधान

लातूर : केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयामार्फत 'पीएम कुसुम योजना' राबविली जात आहे. त्याद्वारे शेतकऱ्यांना सौर कृषी पंप अनुदान तत्त्वावर देण्यात येत आहेत.

त्यासाठी शेतकऱ्यांना पाच ते दहा टक्के लाभार्थी हिस्सा ऑनलाइन भरावा लागतो. पण याचे खोटे संदेश पाठवून शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचे प्रकार राज्यात घडत आहेत.

त्यामुळे शेतकऱ्यांनी अशा खोट्या संदेशांपासून सावध राहावे. असा संदेश आला तर 'महाऊर्जा'कडे याची खात्री करूनच ऑनलाइन पैसे भरावेत, असे आवाहन 'महाऊर्जा'चे लातूरचे विभागीय महाव्यवस्थापक समीर घोडके यांनी केले आहे.'पीएम कुसुम योजनेद्वारे तीन, पाच व साडेसात एचपी क्षमतेचे सौर कृषी पंप ९० ते ९५ टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना दिले जात आहेत. राज्य शासनाने या योजनेसाठी एक लाख चार हजार ८२३ सौर कृषी पंपांसाठी मान्यता दिली आहे.

त्यानुसार महाऊर्जामार्फत लोकसंख्येनुसार जिल्हानिहाय उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. महाऊर्जामार्फत सद्यःस्थितीत सुमारे ७५ हजार ७७८ सौर कृषी पंप आस्थापित करण्यात आले आहेत.

पीएम कुसुम योजनेत महाराष्ट्र देशात अव्वल : खुल्या प्रवर्गातील शेतकऱ्यास दहा टक्के व अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यास पाच टक्के लाभार्थी हिस्सा भरण्यासाठीचा एसएमएस पाठविला जातो. ही योजना राबविण्यासाठी स्वतंत्र ऑनलाइन पोर्टल विकसित केले आहे.

त्याद्वारे अर्जापासून ते कागदपत्रे अपलोड करणे, अर्जाची छाननी करणे, शेतकऱ्याना लाभार्थी हिस्सा भरण्यासाठी एसएमएस पाठवणे, लाभार्थी हिस्सा ऑनलाइन भरण्याची शेतकऱ्याना मुभा देण्यात आली आहे. पण राज्यात काही ठिकाणी शेतकऱ्यांना खोटे संदेश पाठवून लाभार्थी हिस्सा भरून घेऊन फसवणूक केल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत.



## कोणत्याही वातावरणात वाढू शकणारी हवामान प्रतिरोधक पिके!


दुष्काळ, उष्णतेच्या लाटा आणि पूर यासारख्या नैसर्गिक घटकांचा राष्ट्रीय अन्नसुरक्षेवर परिणाम होतो. विशेषत: लहान शेतकऱ्यांना यामुळे मोठे नुकसान सहन करावे लागते. अशावेळी हवामानास अनुकूल पिके जी नैसर्गिक आपत्तिला सुद्धा तोंड देऊ शकतील अशा पिकांची निवड करणे हे अन्नसुरक्षा आणि शाश्वत शेतीची दृष्टीने गरजेचे आहे. विविध परिस्थितीशी जुळवून घेणारी दहा वेगवेगळी पिके जी हवामान-प्रतिरोधक सुद्धा आहेत याची माहिती घेतल्यास शेतकऱ्यांना चांगला फायदा हाईल.

हवामान प्रतिरोधक पिके : हवामान बदलाच्या परिणामांशी जुळवून घेण्यासाठी हवामानास अनुकूल पिके निवडणे हे एक आवश्यक धोरण आहे. ही पिके पाण्याची वाढीव कार्यक्षमता, पोषक तत्वांची समृद्धता आणि जमिनीची सुधारणा यासह अनेक फायदे देतात, ज्यामुळे त्यांना शाश्वत शेतीसाठी मौल्यवान समजले जाते.

ज्वारी : दुष्काळी प्रतिकारशक्ती आणि अनुकूलतेसाठी ज्वारी हे महत्त्वाचे पीक आहे. खोल मुळे यामुळे दुष्काळी भागातही या पिकांची वाढ चांगली होते. प्रथिने, फायबर आणि खनिजे युक्त हे ग्लूटेन-मुक्त धान्य पचनासंबंधी आजार असणार्यांसाठी योग्य आहार आहे. याचा वापर धान्य, पशुआहार तसेच जैवइंधनामध्ये केला जातो. भरपूर सूर्यप्रकाश वातावरणात आणि पाण्याचा चांगला निचरा होणा-या विविध प्रकारच्या मातीत हे पीक चांगले येते.

बाजरी : हे पीक अत्यंत प्रतिकूल हवामान आणि जमिनीत सुद्धा घेता येते. हे धान्य प्रथिने, फायबर आणि खनिजांनी समृद्ध आहेत आणि त्यांचा कमी ग्लायसेमिक निर्देशांक यामुळे रक्तातील साखरेचे नियंत्रण करण्यास मदत करते. कमी कालावधीत येणारे पीक असल्यामुळे वर्षभरात जास्त वेळी येते. कमीतकमी सिंचन, चांगली निचरा होणार्या वालुकामय चिकणमातीमध्ये हे पीक वाढतात.

रताळे : व्हिटॅमिन ए आणि सी, फायबर



आणि अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध रताळे हे कंदफळ रोगप्रतिकारक आणि आरोग्य आणि पचनासाठी चांगले आहे. दुष्काळ सहन करणारे हे पीक विविध प्रकारच्या मातीत आणि हवामानात चांगले वाढतात. उबदार तापमान, चांगल्या निचर्याची वालुकामय जमिनीत लागवड करता येते. चांगल्या उत्पादनासाठी या पिकाला नियमित पाणी द्यावे.

राजगिरा : खाण्यायोग्य पाने आणि बिया यामुळे राजगिरा एक पौष्टिक वनस्पती आहे. उष्ण तापमान आणि आणि दुष्काळी परिस्थितीत हे पीक घेता येते. बिया प्रथिनांचा चांगला स्रोत असून पाने जीवनसत्त्वे आणि खनिजे यांनी समृध्द असतात. हे पीक खराब मातीतही चांगले वाढते. पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन आणि भरपूर सूर्यप्रकाश या पिकासाठी योग्य आहे.

क्विनोआ : क्विनोआ हे एक सुपरफूड आहे, ज्यामध्ये प्रथिने, फायबर आणि आवश्यक खनिजे जास्त आहेत. क्विनोआ हे दुष्काळ ते ओल्या उष्णकटिबंधीय प्रदेशांसह विविध परिस्थितीमध्ये वाढू शकते. चांगला निचरा होणारी, वालुकामय चिकणमाती आणि भरपूर सूर्यप्रकाश या पिकासाठी चांगले असते.

चवळी : चवळी हे दुष्काळ-प्रतिरोधक पीक आहे जे उष्ण, कोरड्या हवामानास अनुकूल आहे. हे पीक जमिनीत नत्राचे स्थिरीकरण करून मातीची सुपीकता वाढवते. चवळी पिकाला भरपूर सूर्यप्रकाश आणि पाण्याचा निचरा होणारी जमीन चांगली मानवते. कमीतकमी सिंचनामध्ये सुद्धा हे पीक चांगले येते. दुष्काळी प्रदेशात शाश्वत शेतीसाठी हे उत्कृष्ट पीक आहे.

अळू : अळू हे ओल्या आणि कोरड्या अशा दोन्ही परिस्थितीत वाढते. ज्यामुळे पाणी साचलेल्या जमिनीतही हे पीक घेता येते. हे पीक कार्बोहायड्रेट्स, फायबर, आवश्यक जीवनसत्वे आणि खनिजे यांनी समृद्ध आहे. हे पीक ओलसर, चांगला निचरा होणारी माती आणि उबदार हवामान पसंत करते. चांगली वाढ होण्यासाठी नियमित सिंचनाची गरज असते.

कॅक्टस : कॅक्टस ही वनस्पती अत्यंत कोरड्या परिस्थितीत येते. रखरखीत वाळवंटात सुद्धा हे पीक घेता येते. कॅक्टीचा एक महत्त्वाचा फायदा म्हणजे त्यांच्या ऊतींमध्ये पाणी साठवण्याची क्षमता, ज्यामुळे त्यांना दुष्काळाच्या कालावधीत सुद्धा टिकून राहता येते. काही जाती, जीवनसत्वे, अँटिऑक्सिडंट्स आणि आहारातील फायबरने समृद्ध असलेली खाद्य फळे तयार करतात, जे पौष्टिक आहेत. कमी देखभाल खराब मातीच्या परिस्थितीत हे पीक वाढण्यास सक्षम असतात. चांगल्या लागवडीसाठी कॅक्टीला चांगली निचरा होणारी माती आणि भरपूर सूर्यप्रकाश आवश्यक आहे. पाणी साचू नये म्हणून ते सामान्यत: कुंडीत किंवा गादी वाफे यावर उगवले जातात.

क्लोव्हर/रानमेथी : क्लोव्हर हे जमिनीत नत्राचे स्थिरीकरण करून मातीचे आरोग्य सुधारते. विविध परिस्थितींशी जुळवून घेणारे हे पीक चारापिक, कव्हर पीक आणि हिरवळीचे खत म्हणून वापरले जाते. क्लोव्हर हे दुष्काळ-सहिष्णु पीक पाण्याचा निचरा होणा-या जमिनीत वाढते. नियमित पेरणी केल्याने चारा पीक म्हणून वापरता येते. हे सिंथेटिक रासायनिक खतावरील अवलंबन कमी करते.

हरभरा/चना : चना किंवा गार्बेन्झो बीन्स, कोरड्या हवामानात आणि पोषक नसलेल्या मातीत वाढतात. ते प्रथिने, फायबर आणि आवश्यक पोषक तत्वांनी समृद्ध आहेत. हे पीक नत्र स्थिरीकरणाद्वारे जमिनीची सुपीकता सुधारतात. उत्तम निचरा होणारी माती आणि भरपूर सूर्यप्रकाश या पिकाला मानवते. वाढत्या हंगामात मध्यम सिंचनाची गरज असते.

## अळींबी लागवड शेतकऱ्यांना कमी खर्चात बंपर नफा

आळंबी ही बुरशी गटातील एक वनस्पती असून याची लागवड प्रामुख्याने पूर्व आशिया तसेच तैवान, चीन, कोरिया तसेच इंडोनेशिया इत्यादी देशात मोठ्या प्रमाणावर केली जाते. भारतामध्ये देखील आळंबीचे उच्च तंत्रज्ञानावर आधारित उत्पादन सुरू झाले असून आता व्यावसायिक दृष्टिकोनातून आळंबी उत्पादन शेतकरी बंधू करू लागले आहेत. आळंबी लागवडीसाठी चांगले स्पॉन अर्थात बी तयार करणे हा शेतीसाठी एक चांगला पूरक उद्योग धंदा ठरू लागला आहे.

महिला वर्गासाठी हा व्यवसाय खूप महत्त्वपूर्ण असून महिलांसाठी आर्थिक स्थैर्य देण्याची क्षमता या व्यवसायात आहे. या लेखामध्ये आपण आळंबी लागवडीसाठी आवश्यक असणाऱ्या बाबींची माहिती करून घेणार आहोत.

आळंबी लागवडीसाठी आवश्यक बाबी

लागणारी जागा- आळंबी उत्पादना करता जागा ही बंदिस्त स्वरूपाची आवश्यक असते. यासाठी झोपडी किंवा बांबू हाऊस किंवा एखादे मातीचे घर यामध्ये आळंबी उत्पादन अत्यंत उत्तम पद्धतीने घेता येते व त्या माध्यमातून चांगला नफा देखील मिळतो.

पाण्याच्या आवश्यकता- आळंबी उत्पादनासाठी पाणी ही एक अत्यंत महत्त्वाची बाब असून आळंबी उत्पादनाकरिता पाणी स्वच्छ व शुद्ध असणे खूप गरजेचे असते. नाहीतर उत्पादनावर विपरीत परिणाम



संभवतो.

आळंबी उत्पादनासाठी लागणारा कच्चामाल- आळंबी उत्पादनासाठी कच्चामाल म्हणून गव्हाचा भुसा, कपाशीच्या पराट्या, भाताचा पेंडा तसेच गवत, सोयाबीनचा भुसा आणि कडबा इत्यादी शेतातीलच कच्चामालाची आवश्यकता असते.

आळंबी चे सगळे उत्पादन हे कच्च्या मालावर अवलंबून असल्यामुळे कच्च्या मालातील सेल्युलोज हा घटक आळिंबीचे प्रमुख अन्न आहे. सेल्युलोज ज्या घटकात अधिक असते त्यावर आळंबीचे उत्पादन अधिक येते. असे घटक पदार्थांची निवड करताना ते कोरडे असणे खूप गरजेचे असून हे नवीन काढणीचे असावेत. पावसात भिजलेले नसावेत.

प्लास्टिक आवश्यक- आळंबी उत्पादनाकरिता प्लास्टिक पॉली प्रोपीलिनचे यांचे वापरावे लागते. त्याची गेज ८० ते १०० इतके असावी. प्लास्टिकचा आकार १८ बाय २२ इंच किंवा २२ बाय २७ इंचाचा असावा.

आळिंबीची बियाणे- आळंबीच्या बियाण्यास स्पॉन असे म्हणतात. गव्हाच्या दाण्यावर आळंबीच्या बिजाणूंची वाढ केली जाते व प्लॅस्टिकच्या पिशवीत ५०० ग्राम, एक किलो या मापामध्ये हे बियाणे उपलब्ध असते.

लागणारे वातावरण- आळंबीच्या आपल्या उत्पादनासाठी वातावरण हे अंधकारमय असणे गरजेचे आहे. हवेतील आद्रता ७० ते ८०% व तापमान १८ ते २८ असावे. चांगल्या उत्पादनाकरिता खेळते हवा असणे खूप महत्त्वाचे आहे. लागणारी यंत्रसामग्री- आळंबी उत्पादनासाठी जास्त मोठ्या प्रमाणात यंत्रसामग्री लागत नसून यामध्ये कच्चामाल भिजवण्यासाठी ड्रम, पाणी गरम करण्याकरता हिटर, वातावरण नियंत्रित करण्यासाठी ह्यूमिडी फायर व फॉगर्स, आळंबी वाढवण्याकरता ड्रायर, तापमान नोंद ठेवण्याकरिता थर्मामीटर, आद्रता दर्शवण्याकरिता हेअर हायग्रोमीटर तसेच फॉरमेलीन व बुरशीनाशक तसेच डाळीचे पीठ इत्यादीची आवश्यकता असते.




### जागतिक दिवस:
### ब्रम्हदेश (म्यानमार) चा मुक्तिदिन

### महत्वाच्या घटना

१६५९ : मुघल सम्राट औरंगजेबने शाह शुजा ला युद्धात हरविले.
१६६४ : छत्रपती शिवाजी महाराज सुरतेच्या सीमेवर पोहोचले. त्यांनी सुरतेचा सुभेदार इनायत खान याला खंडणी देण्यासाठी निरोप पाठविला.
१६७१ : मराठ्यांनी मुघलांबरोबर साल्हेरची लढाई जिंकली.
१९१९ : द जर्मन वर्कर्स पार्टीची स्थापना. या पार्टीचे पुढे नाझी पार्टीत रुपांतर झाले.
१९२४ : महाड महानगरपालिकेने चवदार तळे अस्पृश्य लोकांसाठी खुले केले.
१९३३ : सॅन फ्रान्सिस्को येथील गोल्डन गेट ब्रिजच्या बांधकामाला सुरूवात झाली.
१९४८ : 'रोझ बाऊल फुटबॉल' स्पर्धेचा जगातील पहिला रंगीत माहितीपट 'वॉर्नर ब्रदर्स' तर्फे जगांतील चित्रपटगृहांत प्रदर्शित करण्यात आला.
१९४९ : पुणे यथे राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी सुरू झाली.
१९५७ : विक्रीकर कायदा सुरू झाला.
१९७१ : ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्या मध्ये पहिला एकदिवसीय क्रिकेट सामना मेलबर्न येथे खेळल्या गेला.
१९७४ : अंटार्क्टिकामधील सर्वोच्च तापमानाची (१५ सेल्सिअस) नोंद
१९९७ : रशियाने चेचेन्यातून सैन्य मागे घेण्यास सुरूवात केली.
१९९८ : ज्येष्ठ जर्मन समाजशास्त्रज्ञ गेरहार्ड फिशर यांना कुष्ठरोग आणि पोलिओ नियंत्रणाच्या क्षेत्रात भारतात केलेल्या कार्याबद्दल राष्ट्रपतींच्या हस्ते 'महात्मा गांधी शांतता पुरस्कार' प्रदान करण्यात आला.
१९९९ : द जर्मन वर्कर्स पार्टीची स्थापना. या पार्टीचे पुढे नाझी पार्टीत रुपांतर झाले.
२००६ : भारत आणि नेपाळ ने पारगमन करार ६ महिन्यांनी वाढविला.
२०१४ : ला भारतीय संचार उपग्रह जीसॅट -१४ चे यशस्वी प्रक्षेपण. तेही भारतीय क्रायोजेनिक इंजिन चा वापर करून.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५९२ : शहाजहान - ५ वा मुघल सम्राट (मृत्यू: २२ जानेवारी १६६६)
१६६६ : ला शिखांचे दहावे गुरु गोविंद सिंह यांचा जन्म.
१८५५ : किंग कँप जिलेट - अमेरिकन संशोधक व उद्योजक (मृत्यू: ९ जुलै १९३२)
१८६८ : मराठी संतकवी गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे उर्फ दासगणू यांचा जन्म.
१८६९ : कन्नड साहित्यिक व्यंकटेश तिरको कुलकर्णी यांचा जन्म.
१८८० : ला भारताचे स्वातंत्र्य सैनिक बारीन्द्र कुमार घोष यांचा जन्म.
१८९२ : कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी - लेखक व मराठी भाषातज्ञ (मृत्यू: १२ जून
१९१३ : मराठी साहित्यिक श्रीपाद नारायण पेंडसे यांचा जन्म. (मृत्यू: २३ मार्च २००७)
१९२२ : मोहम्मद उमर 'मुक्री' - आपल्या अभिनयाद्वारे पाच दशके खळाळून हसवणारे विनोदी कलाकार व चरित्र अभिनेते (मृत्यू: ४ सप्टेंबर २०००)
१९२५ : मराठी साहित्यिक रमेश मंत्री यांचा जन्म.
१९२८ : झुल्फिकार अली भुट्टो - पाकिस्तानचे चौथे राष्ट्राध्यक्ष आणि ९ वे पंतप्रधान (मृत्यू: ४ एप्रिल १९७९)
१९३४ : भारतीय राजनीती तज्ञ मुरली मनोहर जोशी यांचा जन्म.
१९४१ : मन्सूर अली खान पतौडी - भारतीय क्रिकेट कप्तान आणि पतौडी संस्थानचे ९ वे व शेवटचे नबाब (मृत्यू: २२ सप्टेंबर २०११)
१९४८ : पार्थसारथी शर्मा - क्रिकेटपटू (मृत्यू: २० आक्टोबर २०१०)
१९४८ : फैय्याज - अभिनेत्री व गायिका
१९५२ : ला भारतीय संसदेचे सदस्य शुशील कुमार मोदी यांचा जन्म.
१९५५ : ममता बॅनर्जी - केंद्रीय मंत्री, पश्चिम बंगालच्या ८ व्या व पहिल्याच महिला मुख्यमंत्री
१९७३ : ला भारतीय चित्रपटाचे अभिनेते तसेच निर्माता उदय चोप्रा यांचा जन्म.
१९८६ : दीपिका पदुकोण - कन्नड, हिन्दी आणि तामिळ चित्रपट कलाकार.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८४७ : कर्नाटक संगीताचे रचनाकार, संगीतशास्त्रज्ञ आणि गायक त्यागराज यांचे निधन.
१९३३ : काल्व्हिन कूलिज - अमेरिकेचे ३० वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: ४ जुलै १८७२)
१९४३ : जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर - अमेरिकन वनस्पतीतज्ञ, शिक्षणतज्ञ, संशोधक आणि शास्त्रज्ञ (जन्म: १ फेब्रुवारी १८६४)
१९५९ : ला मैसूर चे महाराजा मिर्ज़ा इस्माइल यांचे निधन.
१९७१ : भारतीय जादुगार पी. सी. सरकार यांचे निधन.
१९८२ : सी. रामचंद्र - संगीतकार (जन्म: १२ जानेवारी १९१८)
१९९० : रमेश बहल - चित्रपट निर्माते व दिग्दर्शक.
१९९२ : दत्तात्रय गणेश गोडसे - इतिहासकार, नाटककार, कलादिग्दर्शक, वेशभूषाकार आणि नेपथ्यकार (जन्म: ३ जुलै १९१४)
२००३ : गोपालदास पानसे - पखवाजवादक

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# बुलडाणा अर्बनच्या सर्व शाखा सुरळीत सुरू आहेत!

## अफवावर कोणीही विश्वास ठेवू नका; संक्रात सणामुळे सोनं सोडवून घेण्यासाठी गर्दी

जालना। प्रतिनिधी

बुलडाणा अर्बन ही आपल्या सभासदांची विश्वासू साथीदार आहे. महिलेचा संक्रात सण असल्यामुळे गेल्या काही दिवसात मराठवाड्यातील काही शाखांवर सोने तारण कर्ज सोडविण्यासाठी सभासदांची गर्दी दिसून येत आहे यामुळे या बुलढाणा अर्बन ची कोणीतरी अज्ञात व्यक्तीने काहीतरी वेगळीच अफवा पसरली असल्याचे बोलल्या जात आहे. यामागे कर्नाटक राज्यातील एका साखर कारखान्याशी निगडित अफवा असल्याचे समोर आले आहे. मात्र, संस्थेने सभासदांच्या सोन्याची पूर्ण व्यवस्था केली असून, त्यांची आर्थिक स्थिती अत्यंत मजबूत आहे. सभासदांनी घाबरून जाण्याची कोणतीही आवश्यकता नसल्याचे संस्थेने स्पष्ट केले आहे.



ग्रामीण भागातील खाजगी सावकारीला आळा घालण्यासाठी बुलडाणा अर्बनने जिल्ह्यासह परिसरात मोठ्या प्रमाणावर शाखा उघडल्या आहेत. ज्यांना पत नाही, त्यांना अर्थसाहाय्य करुन पत निर्माण करण्याचे उत्तम काम या संस्थेच्या माध्यमातून होत आहे. लग्न, शिक्षण, वैद्यकीय, व्यावसायिक आणि सामाजिक गरजा भागवण्यासाठी अथक परिश्रम करणारी ही संस्था सभासदांच्या पाठीशी खंबीरपणे कायम उभी आहे. मराठवाड्यातील काही शाखा रात्रभर सुरु ठेवून सभासदांना सोने सोडविण्याची सोय संस्थेने उपलब्ध करुन दिली आहे. याबाबत काही सभासदांनी सांगितले की, त्यांचे सोने ७० हजार रुपयांनी गहाण ठेवलेले आहे. कर्नाटक राज्यातील एका साखर कारखान्याच्या ऊसतोड कामगाराने बुलडाणा अर्बन सोने १.५० लाख तोळ्याने विकणार असा मेसेज बनावट पाठविला. काहींनी सांगितले की, कारखान्याने गाड्या पुरवून गर्दी करण्यास सांगितले. परिणामी, १० टक्के व्याज देत पैसे घेऊन लोक सोने सोडवत आहेत. या सर्व अफवा असून, संस्थेची स्थिती मजबूत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. सोने तारण कर्ज सोडविण्यातून मोठ्या प्रमाणावर रक्कम जमा होत आहे. म्हणून संस्थेच्या सभासदांनी गर्दी पाहून गोंधळून जाण्याची गरज नाही. शासनाने संस्थेवर कोणतेही निबंध घातलेले नाहीत. मराठवाड्यातील सर्व शाखांचे कामकाज नियमित सुरु असल्याचे संस्थेने म्हटले आहे. संस्थेच्या मुख्यालयाशी संपर्क साधल्यावर समजले की, कर्नाटक राज्यातील त्या साखर कारखान्याला कर्ज दिले होते. आता ते कर्ज थांबविले आहे. निलंबित कर्मचाऱ्यांना हाताशी धरुन कारखान्याने हा कट रचला असून, गाड्या पाठवून कामगारांना शाखांवर गोंधळ घालण्यास सांगितले. यामुळे मराठवाड्यातील ८ ते १० शाखांवर गर्दी झाल्याचे पुढे येत आहे. संस्थेने रात्री ३ वाजेपर्यंत शाखा सुरु ठेवून सभासदांचे सोने परत दिले आहे. बुलडाणा अर्बनची मजबूत आर्थिक स्थिती एकुण ठेवी : १५,००० कोटी रुपये सोने तारण: ५,००० कोटी रुपये, वेअरहाऊस कर्ज : १,५०० कोटी रुपये. संस्था बॅलन्स : ४,००० कोटी रुपये स्वमालकीची मालमत्ता ३७३ गोदामे, ९ कोल्ड स्टोअरेज, ४ भक्तनिवास, ४७६ शाखा आणि २२ शाळा. अनेक वर्षांचा विश्वास असे बुलढाणा अर्बनचे बुलढाणा अर्बनचे व्यवस्थापक यांच्याकडून सांगण्यात आले.

# जालना शहराचा विकास भारतीय जनता पक्षाच्या कार्यकाळातच झाला- दानवे

जालना। प्रतिनिधी

जालना महानगरपालिका निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाची अत्यंत महत्त्वाची व निर्णायक बैठक जालना शहरात पार पडली. येत्या ५ जानेवारी २०२६ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होणाऱ्या अति विराट जाहीर सभेच्या नियोजनासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती. ही भव्य सभा जालना शहरातील मामा चौकात होणार असून, सभेला अभूतपूर्व प्रतिसाद मिळावा यासाठी प्रत्येक वार्डातून हजारो नागरिक आणण्याच्या जबाबदाऱ्या उमेदवारांवर सोपविण्यात आल्या. या बैठकीस व्यासपीठावर माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर, भाजपा जिल्हाध्यक्ष आमदार नारायणराव कुचे, आमदार संतोष दानवे, माजी आमदार कैलास गोरंट्याल, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष भास्करआबा दानवे तसेच भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी जालना शहराच्या सर्वांगीण विकासाचा आढावा घेत, ''जालना शहराचा खऱ्या अर्थाने विकास भारतीय जनता पक्षाच्या कार्यकाळातच झाला आहे,'' असा ठाम दावा केला. विकासकामे, पायाभूत सुविधा आणि नागरी सोयी-सुविधांच्या माध्यमातून भाजपने जालना शहराला नवी दिशा दिल्याचे त्यांनी सांगितले.

तर आमदार बबनराव लोणीकर यांनी अधिक आक्रमक भूमिका मांडत, ''जालना महानगरपालिकेत भारतीय जनता पक्षाचे तब्बल ४५ उमेदवार निवडून येतील आणि महापौरपदावर भाजपाचाच उमेदवार विराजमान होईल,'' असा विश्वास व्यक्त केला. कार्यकर्त्यांच्या मेहनतीवर आणि जनतेच्या विश्वासावर भाजप मोठा विजय मिळवेल, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी आमदार नारायणराव कुचे, आमदार संतोष दानवे, माजी आमदार कैलास गोरंट्याल आणि शहर जिल्हाध्यक्ष भास्करआबा दानवे यांनीही मार्गदर्शन केले. त्यांनी कार्यकर्त्यांना भारतीय जनता पक्षाची विचारधारा, संघटनात्मक ताकद आणि निवडणूक रणनिती सविस्तरपणे समजावून सांगितली. या बैठकीस जालना महानगरपालिकेची निवडणूक लढवणारे जालना शहरातील सर्व उमेदवार आपल्या समर्थकांसह मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामुळे संपूर्ण सभागृहात उत्साहाचे आणि आत्मविश्वासाचे वातावरण पाहायला मिळाले. दरम्यान, उद्या दिनांक ४ जानेवारी २०२६ रोजी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत जालना शहरात भाजप बूथप्रमुख, उमेदवार आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांची स्वतंत्र बैठक होणार आहे. या बैठकीत बूथस्तरावरील तयारीचा आढावा घेत अंतिम रणनिती निश्चित केली जाणार असल्याची माहिती देण्यात आली. एकूणच जालना महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने जोरदार तयारीला सुरुवात केली असून, आगामी दिवसांत जालना शहरातील राजकीय वातावरण अधिक तापण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

# महायुतीचे सरकार दमदार; मंत्री विखे पाटलांचा भाजपा व राष्ट्रवादी उमेदवारांना कानमंत्र!

अहिल्यानगर । प्रतिनिधी

महानगरपालिका निवडणुकीची पूर्ण जबाबदारी मी घेतली असून निवडणुकीत पूर्ण लक्ष देणार आहे. आता निवडणुकांची पद्धत व माध्यमे बदलले आहेत. त्यामुळे भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्या उमेदवारांनी जास्तीत जास्त आपापल्या मतदारसंघातील नागरिकांशी संवाद ठेवावा. सोशल मीडियाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात फेक नॅरीटिव्ह, खोटे रील द्वारा विरोधक अपप्रचार करतील. मात्र युतीच्या उमेदवारांनी ठामपणे आपली विकासात्मक भूमिका व पक्षाची भूमिका मतदारांसमोर मांडावी. या निवडणुकीत युतीला शंभर टक्के यश मिळणार आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली महानगरपालिकेच्या निवडणुकीत युती सर्वात मोठा विजय मिळवत नवा इतिहास रचेल, अशी खात्री राज्याचे जलसंधारण मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी वक्त करून युतीचे उमेदवार प्रकाश भागानगरे व कुमारसिंह वाकळे हे बिनविरोध निवडून आल्याने युतीच्या विजयाची नांदीच झाली असल्याचे सांगून आनंद व्यक्त केला.



अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्या सर्व उमेदवारांची महत्त्वपूर्ण बैठक पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरवारी नगरमध्ये झाली. यावेळी आ.संग्राम जगताप, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, समन्वयक विनायक देशमुख, सुवेंद्र गांधी, बाबासाहेब सानप यांच्यासह युतीचे सर्व उमेदवार उपस्थित होते. या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार प्रकाश भागानगरे व कुमारसिंह वाकळे हे बिनविरोध निवडून आल्याबद्दल पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी त्यांचा विशेष सत्कार करून अभिनंदन केले. तसेच युतीच्या उमेदवारांची घोषणा करताना तसेच एबी फॉर्म देताना कोणताही गोंधळ निर्माण न होता अत्यंत शांतपणे झाल्याबद्दल मंत्री विखे यांनी आ.संग्राम जगताप यांच्यासह भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. आमदार संग्राम जगताप म्हणाले, राज्यातील महायुतीचे सरकार हे दमदार सरकार आहे. त्यामुळेच नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकांमध्ये महायुतीला मोठे यश मिळाले आहे. असेच यश आपल्याला पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरमध्ये मिळवायचे आहे. युतीचे मार्गदर्शक पालकमंत्री राधाकृष्ण विखे हे खूप अनुभवी व कार्यक्षम नेतृत्व आहे. त्यांचा २५ ते ३० वर्षांचा अनुभव आपल्याला कामी येणार आहे. येणारे पंधरा दिवस अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यामुळे गाफील न राहता गंभीर्याने निवडणुकीची रणनीती ठरवा. महापालिका निवडणुकीत तिन्ही घटक पक्षांची महायुतीच व्हावी यासाठी वैयक्तिक लक्ष घालून खूप प्रयत्न केले. रात्रभर बैठका घेत चर्चेचे दळण दळले मात्र त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही. आता निवडणूक लढताना युतीच्या उमेदवारांनी गाफील न राहता सक्षमपणे निवडणुकीला सामोरे जात नागरिकांचे उंबरे व स्वतःची चप्पल झिजवा, असा सल्ला देत आ.जगताप यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांची मोठी साथ आपल्याला मिळत आहे. ते वैयक्तिक लक्ष या निवडणुकीत घालत असल्याचे सांगून काहींच्या चारठाळपणामुळे डॉ.सुजय विखे यांच्या पराभवाने लोकसभा निवडणुकीत आपल्याला अपयश आले, याची खंत वाटते. पण ज्यावेळी संधी मिळेल त्यावेळेस २०० % काम करून हे अपयश पुसून टाकू, असा विश्वास व्यक्त केला. बैठकीचे प्रास्ताविक भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी आभार मानले.

# निवडणूक डोळ्यासमोर ठेवून रस्त्यांची डागडुजी!

## भावी जिल्हा परिषद सदस्यांचा संधीसाधूपणा उघड; डांबर न वापरता रस्ताकाम

बीड। प्रतिनिधी

ग्रामीण भागातील खड्डेमय रस्त्यांमुळे दुचाकीस्वार घसरून पडून अपघात होत असताना, नागरिकांचे जीव जात असताना आणि पावसाळ्यात शालेय विद्यार्थ्यांना चिखलातून वाट काढावी लागत असताना ग्रामस्थांनी दिलेली निवेदने, लेखी तक्रारी व आंदोलने संबंधित भावी जिल्हा परिषद सदस्यांनी सातत्याने दुर्लक्षित केली होती. मात्र आता जिल्हा परिषद निवडणूक जवळ येताच अचानक रस्त्यांची तात्पुरती डागडुजी सुरू झाल्याचे चित्र दिसून येत आहे. काही ठिकाणी खड्ड्यांवर माती टाकणे, खडी पसरवणे, नाममात्र डांबरीकरण करणे तर काही ठिकाणी ''स्वखर्चाने रस्ता केला'' असे गाजावाजा करत फोटो-व्हिडीओ सोशल मीडिया व स्थानिक वृत्तपत्रांत झळकू लागले आहेत. मात्र हा खरा विकास नसून निवडणूक डोळ्यासमोर ठेवून केलेली दिखाऊ मलमपट्टी असल्याचा घणाघाती आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला आहे.

निवडणूक नसती तर हे रस्ते तसेच खड्डेमय राहिले असते. अपघातात माणसं गेली, अनेकजण जखमी झाले, तरी कुणालाही जाग आली नाही. आता मतांसाठी अचानक प्रेम उफाळून आले आहे,'' अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ. ढवळे यांनी दिली. ही डागडुजी तात्पुरती असून पावसाळा आला की परिस्थिती पुन्हा जैसे थे होणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला. केवळ निवडणूकपुरते नव्हे तर दीर्घकालीन, दर्जेदार व टिकाऊ रस्ते बांधकाम व्हावे, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे. बीड तालुक्यातील बालाघाटावरील चौसाळा जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग मांजरसुंभापाटोदामहाजनवाडीबोरखेड या रस्त्याच्या डागडुजीचे काम सुरू असून सुमारे १० लाख रुपये खर्चाचे अंदाजे ८०० मीटर खडी-डांबरीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. विशेष म्हणजे रस्त्याच्या कामात डांबरच न वापरता केवळ खडी टाकून काम केले जात असल्याचे निदर्शनास येताच संतप्त ग्रामस्थांनी रस्ताकाम तात्काळ बंद पाडले. यावेळी कंत्राटदाराने आपली चूक कबूल करत रस्त्यावरील खडी बाजूला काढून पुन्हा डांबर टाकून योग्य पद्धतीने काम करण्याचे आश्वासन दिल्यानंतरच ग्रामस्थांनी काम सुरू करण्यास परवानगी दिली. या वेळी सचिन घरत, गौतम घरत, कृष्णा घरत, संतोष शिंदे, पिंटू घरत, दादाहरी घरत आदी ग्रामस्थ उपस्थित होते. एकंदरीतच जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू झालेल्या या रस्ते ''दुरुस्ती''मुळे विकासापेक्षा भावी लोकप्रतिनिधींचा संधीसाधूपणाच अधिक उघड होत असल्याची चर्चा सध्या गावोगावी रंगू लागली आहे.

# थंडीने कहर केला! पिके धोक्यात?

अहिल्यानगर। प्रतिनिधी

महाराष्ट्रात गेल्या दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण असले तरी गारठा मात्र कायम असून राज्याच्या अनेक भागांत थंडीचा कडाका वाढल्याचे चित्र आहे. मुंबईसह नाशिक, पुणे, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत पहाटेच्या वेळी तीव्र थंडी जाणवत असून ठिकठिकाणी शेकोट्या पेटलेल्या दिसत आहेत. हवामान विभागाने आजही तापमानात चढ-उतार राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. काल राज्यातील काही भागांत ढगाळ वातावरणासह हलक्या स्वरूपाचा पाऊसही पडला. मात्र, या ढगाळ वातावरणाचा थंडीवर फारसा परिणाम झाला नसून अनेक ठिकाणी किमान तापमान १० अंश सेल्सिअसच्या खाली नोंदवले गेले आहे. नाशिक जिल्ह्यातील निफाड येथे २० डिसेंबर २०२५ रोजी यंदाच्या हिवाळ्यातील नीचांकी ४.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती.

दरम्यान, हवामान खात्याने राज्यातील काही जिल्ह्यांना थंडीच्या लाटेचा यलो अलर्ट जारी केला आहे. सतत बदलणाऱ्या तापमानामुळे नागरिक हैराण झाले असून सर्दी, खोकला आणि तापाचे प्रमाण वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. थंडीचा फटका शेतकऱ्यांनाही बसला असून हंगामी पिकांवर त्याचा परिणाम दिसून येत आहे. विशेषतः भाजीपाला आणि फळबागांमध्ये गारठ्यामुळे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. २०२५ हे वर्ष १९०१ पासूनचे आठवे सर्वाधिक उष्ण वर्ष ठरले असले तरी, वर्षाच्या शेवटच्या तीन महिन्यांत तुलनेने थंड हवामान अनुभवायला मिळाले. नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यांत थंडी अधिक वाढल्याचे स्पष्ट झाले आहे. या वर्षात शक्ती, मोंथा, सेन्यार आणि डिटवाह अशी चार चक्रीवादळे तयार झाली. यापैकी मोंथा, सेन्यार आणि डिटवाह ही चक्रीवादळे बंगालच्या उपसागरात, तर शक्ती हे चक्रीवादळ अरबी समुद्रात निर्माण झाले. मॉन्सूनोत्तर हंगामात उत्तर हिंदी महासागरात एकूण ११ तीव्र कमी दाब प्रणाली विकसित झाल्याची माहिती हवामान खात्याने दिली आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस नागरिकांनी थंडीपासून काळजी घेण्याचे आणि शेतकऱ्यांनी पिकांचे संरक्षण करण्याचे आवाहन केले आहे.

# राज्यातील पन्नास दिव्यांगांचे नववर्ष कळसुबाई शिखरावर

## बीडचे कचरू चांभारे दहाव्यांदा कळसुबाई शिखरावर

बीड। प्रतिनिधी

शिवुर्जा प्रतिष्ठान दरवर्षी नवीन वर्षाचे स्वागत कळसुबाई शिखरावर करत असते.राज्यातील दिव्यांगांसाठी हा दरवर्षीचा अनोखा उपक्रम आहे.शिवुर्जा प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवाजी गाडे (२५ वेळा कळसुबाई शिखर) व सचिव कचरू चांभारे दोघेही पोलिओग्रस्त दिव्यांग असून त्यांना गडकोट भटकंतीचा छंद आहे.या छंदातूनच ते दरवर्षी दिव्यांगांना सोबत घेऊन कळसुबाई शिखर सर करत असतात. यावर्षीच्या ऊर्जा मोहिमेत छत्रपती संभाजी नगर, बीड, पुणे, बुलढाणा, अमरावती, मुंबई, नाशिक, रायगड, ठाणे, लातूर इत्यादी जिल्ह्यातून पन्नास दिव्यांग सहभागी झाले. माची मंदिराजवळ ३१ डिसेंबर रोजी दुपारी सर्व दिव्यांग एकत्र आले. एकमेकांशी ओळख करून घेतली.बीड येथील दुर्ग अभ्यासक कचरू चांभारे यांनी ऊर्जा मोहिमेमागील भूमिका,कळसुबाई देवीचा इतिहास,गडकोट वाटा यांबद्दल सविस्तर माहिती सांगितली.ते स्वतः दहाव्यांदा कळसुबाई शिखरावर गेले आहेत. दुपारी दोन वाजता शिखराकडे सर्व दिव्यांग मार्गस्थ झाले.




५४०० फुट उंचीच्या कळसुबाई शिखराकडे जाणारी वाट खूप खडतर आहे.तीव्र उतार,मोठमोठ्या शिळा,लोखंडी शिड्या पार करून हे सारे दिव्यांग सायंकाळी सहापर्यंत शिखराजवळ पोहचले.मावळत्या वर्षाचा सूर्यास्त पाहिला व विहिरी जवळील विस्तीर्ण पठारावर कडाक्याच्या थंडीत कापडी तंबुत मुक्काम केला. नव वर्ष प्रारंभी सकाळी लवकर उठून शिखर गाठले.उगवत्या सूर्याचे विहंगम दृश्य नजरेत साठवून नवीन वर्ष स्वागताचा जल्लोष केला.कळसुबाई देवीचे दर्शन घेतले.सहभागी सर्व दिव्यांगांचा अध्यक्ष शिवाजी गाडे व सचिव कचरू चांभारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी काही दिव्यांगांना आनंद अश्रूंचे पूर फुटले होते. दुपारी बारा वाजता सर्व दिव्यांग खाली आले.हनुमान मंदिरात जेवणं करून बारी गावचे सरपंच वैशाली खाडे,उपसरपंच गणेश खाडे, जहागिरदार वाडी सरपंच पंढरीनाथ खाडे, उपसरपंच रूख्मिनी करटुले,सदस्य रोहिणी खाडे यांच्या हस्ते सर्वांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. मोहीम यशस्वी करण्यासाठी शिवाजी गाडे याच्या मार्गदर्शनाखाली कचरू चांभारे, कल्याण घोलप,जगन्नाथ चौरे,सुनील वानखेडे, सागर बोडके यांनी विशेष परिश्रम घेतले. शिवाजी गाडे अध्यक्ष, कचरू चांभारे सचिव, जगन्नाथ चौरे, मच्छिंद्र थोरात, जीवन टोपे, सागर बोडके, कल्याण घोलप, विजय पाटील,अतुल कदम, अवधूत लाळे, जालिंदर दिवेकर, तेजस्वी कदम, किरण जाधव,सुनील वेदपाठक,प्रियंका लाड, दत्तु बखळे,भास्कर शिंदे, गणेश सुकाळे, रामराज गिरी, संभाजी जाधव, गणेश अत्तरकार, रंजना शेवाळे,मदन बर्वे ,नामदेव फरडे, अरुण गायधरे,श्रीदत्त बिरादार ,आबा थोरात,शंकर पवार , पंकज डुकरे,हनुमंत बाबर ,यश खोपडे, प्रशांत विपिनकर, अरुण गायकवाड, संगीता शेवाळे,योगेश जाधव, मुकुंद आहेर,गहिनीनाथ भिसे, सतीश आणेराव, लक्ष्मीकांत शिरूरकर, प्रमोद अंदुरे,शरद गायके ,दत्तात्रय प्रभाळे, बाजीराव ढाकणे ,अलोक पवार, श्रावणी सावंत, संजय अलमुले,राजू खोपडे, अमर कदम, तेजल कदम आदी उपस्थित होते.

# गोवंशाची तस्करी केल्यास थेट तडीपार करणार -अप्पर पोलीस अधीक्षक



जालना। प्रतिनिधी

जालना जिल्ह्यामध्ये गोवंश तस्करी आणि गोमांस विक्री करणाऱ्या विरुद्ध कारवाई करून थेट तडीपार करण्यात येणार आहे असे आवाहन जिल्हा पोलीस प्रशासनाच्या वतीने देण्यात आले आहे जालना शहरातील ३२ इसमांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून यापुढे गोवंशाची तस्करी केल्यास थेट तडीपारीची कारवाई केली जाईल असा इशारा अप्पर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी योनी आज दिला आहे.

जालना जिल्ह्यात विविध पोलीस ठाण्याअंतर्गत दाखल गोवंश तस्करी व गोवंश मांस विक्री करणाऱ्या रेकॉर्डवरील ३५ गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करत पोलीसांनी त्यांच्याकडून शांतता भंग तसेच चांगल्या वर्तणुकीचे बंदपत्र घेण्यात आले आहे.

तसेच चालु वर्षात जालना जिल्हयात गोवंश तस्करीच्या ६१ कारवाई करून ४७८ जनावरांची सुटका करण्यात आल्याची माहीतीही श्री. नोपाणी यांनी दिली. आज या सर्व गोवंश तस्करांना समोरा समोरून बोलावून अगदी कडक भाषेत समज देण्यात आली. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी, संदिप भारती, आदींची उपस्थिती होती.

# वडवणी तालुक्यातील ऊसतोड मजुराच्या अंगावर ट्रॉली कोसळली

## वृद्ध आई वडील, पत्नीसह तीन चिमुकल्या लेकरांवर अनाथ होण्याची वेळ; लातूर जिल्ह्यातील साखर कारखान्यावरील दुर्घटनेने शोककळा

**वडवणी । प्रतिनिधी**

गोड ऊसाची कडू कहाणी पोटाची खळगी भरण्यासाठी तसेच मेहनतीच्या घामातून कुटुंबाचं भविष्य घडवायचं स्वप्न उराशी बाळगणारे वडवणी तालुक्यातील डोंगरयाची वाडी येथील डोंगरे कुटुंब आपल्या चिमुकल्या तीन लेकरांसह ऊस तोडणीसाठी गेलं होतं. ऊस वाहतुकीदरम्यान झालेल्या भीषण अपघातात कुटुंबप्रमुख तरुण ऊसतोड कामगार गणेश डोंगरे यांच्या अंगावरून ट्रॅक्टर ट्राली गेल्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूमुळे त्याचे वृद्ध आई-वडील, पत्नी आणि तीन चिमुकल्या लेकरावर अनाथ होण्याची वेळ आली. या घटनेमुळे वडवणी तालुक्यासह बीड जिल्ह्यात शोकाकळा पसरली आहे.

वडवणी तालुक्यातील डोंगरेवाडी (सोन्नाखोटा) येथील गणेश डोंगरे यांना केवळ एक एकर जमीन. आई वडील भोळसर असल्यामुळे गणेश यांच्या वरच कुटुंबाची जबाबदारी. त्याला पत्नी अत्यंत सोज्वळ गुणवान आणि कष्टाळू मिळाली होती. पत्नी अश्विनी सोबत संसार थाटल्यानंतर तीन मुली झाल्या. तीन मुलींचे पालनपोषण, आई-वडिलांची ◀◀ पान ३ वर



### पत्रकार संघाकडून काढण्यात येणार मदत फेरी

अश्विनी आणि गणेश डोंगरे यांचे कुटुंब अत्यंत हालाकीच्या परिस्थितीतून मोठ्या जिद्दीने जगत होतं. मात्र नियतीने त्यांचा खेळ उधळून लावला. या परिवारातील चिमुकल्या लेकरांना आधार मिळावा यासाठी वडवणी तालुक्यातील सर्व पत्रकारांच्या वतीने मदत फेरी काढण्यात येणार आहे. वडवणी तालुका आणि बीड जिल्ह्यातील सर्व दानशूर यांनी या अनाथ कुटुंबाला मदत करावी असे आवाहन पत्रकारांच्या वतीने तालुकाध्यक्ष अशोक निपटे यांनी केले आहे.

### किमान २५ लाखाची आर्थिक मदत कारखान्याने द्यावी

लातूर जिल्ह्यातील ज्या साखर कारखान्यावर हा अपघात झाला तो अपघात केवळ साखर कारखान्याच्या चुकी मुळे झाला आहे. त्या ठिकाणी वाहने उभे राहतात त्या ठिकाणी व्यवस्थित रस्ता नाही. त्यामुळे हा अपघात कारखान्याच्या चुकीमुळे झाला आहे. विशेष म्हणजे कारखान्यावर वेळेवर माप होत नव्हते आणि माप न झाल्यामुळे गणेशला आपले वाहन मापाच्या प्रतीक्षेत उभा करून थांबावं लागलं होतं. त्यामुळे अपघाताची जबाबदारी स्वीकारून साखर कारखान्याने गणेशच्या तीन लेकरं, पत्नी आई-वडिलांसाठी किमान २५ लाख रुपयांची आर्थिक मदत तत्काळ द्यावी व त्यांच्या पालनपोषणाची, शिक्षणाची जबाबदारी स्वीकारावी अशी मागणी होत आहे.

# ऑनलाइन जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; ५४ हजारांचा मुद्देमाल जप्त

## सहा.पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या पथकाची धडक कारवाई

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील सदर बाजार नाका परिसरातील एका इमारतीच्या तळमजल्यावर बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या 'फन टार्गेट' नावाच्या ऑनलाइन बिंगो जुगार अड्ड्यावर सहायक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या विशेष पथकाने शनिवारी (दि.०३ जानेवारी) सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास धडक कारवाई केली. या मोहिमेत पोलिसांनी दोन आरोपींना रंगेहात पकडले आहे. त्यांच्याकडून संगणक संच आणि रोख रकमेसह एकूण ५४ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून चार जणांविरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सहायक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांना सदर बाजार नाका येथील आर. एन. बिल्डिंगच्या तळमजल्यात अवैध जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीची खात्री पटल्यानंतर शिंदे यांच्या आदेशानुसार पोलीस पथकाने सलमान चहाच्या हॉटेल शेजारी असलेल्या या ठिकाणी अचानक छापा टाकला. यावेळी परवेज शेख मोईज आणि मोहीद रशीद खान हे दोघे संगणकावर ऑनलाइन बिंगो जुगार खेळत आणि खेळवत असताना मिळून आले. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून ७,७३० आणि ५,९७० अशी एकूण १३,७०० रुपयांची रोख रक्कम जप्त केली. तसेच पीसी, मॉनिटर, की-बोर्ड आणि एलसीडी टीव्ही असे जुगाराचे साहित्य पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पकडण्यात आलेल्या आरोपींची चौकशी केली असता, हा जुगार अड्डा अंबाजोगाई येथील वाजेद सय्यद आणि आसिफ पठाण यांच्या मालकीचा असल्याचे निष्पन्न झाले. या कारवाईत ◀◀ पान ३ वर

### आष्टी येथे ११ ते १७ जानेवारी दरम्यान भव्य श्रीराम कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन

# श्रीराम कथेचा लाभ घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहा -आ. धस

**आष्टी । प्रतिनिधी**

आमदार सुरेश धस प्रतिष्ठान यांच्या वतीने आष्टी येथे दिनांक ११ जानेवारी ते १७ जानेवारी २०२६ या कालावधीत भव्य संगीत श्रीराम कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री व आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांच्या पुढाकारातून हा धार्मिक व सांस्कृतिक सोहळा साकार होत आहे.

या श्रीराम कथेचे निरूपण देवदास स्वामी मठ, दादेगाव येथील परमपूजनीय महंत मंदार महाराज रामदासी हे करणार असून, आष्टी येथील पंचायत समिती कार्यालयाच्या प्रांगणात हा सोहळा संपन्न होणार आहे.





दिनांक ११ ते १७ जानेवारी या कालावधीत दररोज दुपारी १२.३० ते सायंकाळी ४.०० या वेळेत श्रीराम कथा होणार असून, मकर संक्रांतीच्या दिवशी (१४ जानेवारी) सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत विशेष राम कथा होणार आहे.या भव्य दिव्य सोहळयाच्या प्रारंभाच्या पूर्वसंध्येला आकर्षक शोभायात्रेने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात येणार आहे. तसेच दररोज प्रभू श्रीराम आरती, संत पूजन व भाविकांसाठी प्रसाद वाटप करण्यात येणार आहे. या श्रीराम कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याच्या माध्यमातून भक्ती, संस्कार आणि अध्यात्माचा प्रसार होणार असून, आष्टी परिसरातील २० ते २५ गावांतील भाविकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग अपेक्षित आहे. यावेळी आमदार सुरेश धस यांनी ''हा सोहळा प्रत्येक रामभक्तासाठी आध्यात्मिक पर्वणी असून, सर्व भाविकांनी कुटुंबासह उपस्थित राहून श्रीराम कथेचा लाभ घ्यावा,असे आवाहन केले आहे.

# शेळी-बोकुड चोरण्याची नवी शक्कल

## आष्टीत रिक्षात घास दाखवून शेळी आली की गुडूप

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरांमध्ये शेळ्यांची चोरी करणारी टोळी सक्रिय शहरातून आत्तापर्यंत जवळपास २० शेळ्या लंपास झाल्या आसुन आष्टी शहरांमध्ये रहिवाशी असणारे काही लोक आपल्या घरी शेळी पालन करतात. शेळ्या हे असा प्राणी आहे त्याला दिवसांमध्ये काही काळ मोकळे सोडावे लागते .याच गोष्टीचा फायदा घेत आष्टी शहरांमध्ये शेळ्या चोरणारी टोळी सक्रिय झाली आहे. यामध्ये आपल्या चार चाकी रिक्षामध्ये हिरवा चारा ठेवून या शेळ्यांना या चाऱ्याचा आमिश दाखवून त्यांना उचलून रिक्षामध्ये टाकून प्रसार होतात असाच प्रकार परवा आझाद नगर भागामध्ये वास्तव्य



करणारी तीन कुटुंबातील व्यक्तींच्या सहा शेळ्या चोरून नेण्यात हे चोर यशस्वी झाले आहे याकडे पोलीस प्रशासनाने लक्ष ◀◀ पान ३ वर



## मोठेवाडीत सावित्रीबाई फुले जयंती साजरी

माजलगाव : तालुक्यातील मोठेवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.प्रथमता: राजमाता जिजाऊ व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच सुभद्रा खेत्री ह्या होत्या तर समता परिषदेचे तालुकाध्यक्ष जगन्नाथ खेत्री,पत्रकार राजाभाऊ पास्टे, अंगद खेत्री,विलास जाधव,तुकाराम रासवे,सचिन पास्टे,अशोक खेत्री,बालाजी करपे,संजय रोकडे,पिनु आस्वले,कुलदीप खेत्री,अंगणवाडीताई पंचफुला पास्टे, संगीता आलाट,मुक्ता पास्टे,अंकिता खेत्री यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संभाजी पास्टे यांनी केले तर आभार गणेश सर्जे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रकाश शेळके, गणेश पास्टे यांनी परिश्रम घेतले. यावेळी शाळेतील मुलींनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा साकारून उपस्थितांची मने जिंकली.यावेळी ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# बसस्टँडवर न जाता बस बायपासने नेली

चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा व पारगाव या गावात एसटी महामंडळाच्या अनेक गाड्या न जाता बाहेरून थेट बायपास वरून जाणाऱ्या बस चालकावर महामंडळाच्या भरारी पथकाने तीन बसवर अचानक तपासणी करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली अशी घटना दिनांक ०३/०१/२०२६ रोजी वार शनिवार घडली सदर प्रकरणी माहिती अशी की आशिकी चौसाळा व पारगाव या गावातून महामंडळाच्या बसेस चौसाळा येथे थांबा असताना सुद्धा गावात गाडी न





**एसटीच्या तीन वाहक-चालक यांच्यावर कारवाई**

आणता सरळ बायपासने मार्गस्थ होतात सदर महामंडळाच्या बसेस चौसाळा गावात बस स्थानकावर न येता बायपासनी गेल्यामुळे अनेक प्रवाशाची गैरसोय व कुचंबना होत होती सदर बसेस बायपास गावात आणाव्यात याप्रकरणी स्थानिक पत्रकारांनी अनेकदा आपल्या वृत्तपत्रातून वृत्त देऊन महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाला तक्रारी दिल्या नुसार महामंडळाच्या पथकाने दि ०३ ०१ २०२६ रोजी पंढरपूर मुक्ताईनगर तसेच सोलापूर संभाजीनगर तसेच संभाजीनगर जत अशा तीन गाड्यावर ◀◀ पान ३ वर

# संत वामनभाऊ महाराजांचा ५० वा सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळा उत्साहात सुरू; आ.धस यांच्या हस्ते पूजन

आष्टी । प्रतिनिधी

श्री क्षेत्र गहिनीनाथ गड येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ५० व्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथीनिमित्त भव्य धार्मिक सोहळयाला आजपासून भक्तिभावपूर्ण वातावरणात सुरुवात झाली आहे. या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित सप्ताहाच्या प्रारंभी आ. सुरेश धस तसेच गडाचे महंत ह.भ.प.विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले.

या पावन प्रसंगी श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी पादुकापूजन, समाधीपूजन तसेच पारंपरिक पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. आ.सुरेश धस यांनी या सर्व धार्मिक विधींमध्ये सहभागी होत संतांच्या चरणी मनोभावे दर्शन घेतले.

श्री संत वामनभाऊ महाराज यांचा जन्म इ.स. १८९१ मध्ये झाला असून २४ जानेवारी १९७६ रोजी त्यांनी देहत्याग केला. त्यानंतर २५ जानेवारी १९७६ रोजी त्यांची समाधी स्थापन करण्यात आली. या ऐतिहासिक घटनेला यंदा ५० वर्षे पूर्ण होत असून, यावर्षी शनिवारचा शुभयोग लाभल्याने भाविकांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला. प.पू. विठ्ठल महाराज यांनी संतांची मठपरंपरा अखंडपणे जपली असून भक्ती, सेवा आणि अध्यात्माची परंपरा पुढे नेण्याचे कार्य अविरत सुरू ठेवले आहे. शनिवारी सकाळी होम-हवनाने या सुवर्णमहोत्सवी सोहळ्याची सुरुवात झाली ◀◀ पान ३ वर



# घर फोडून अज्ञात चोरट्यांनी साठ हजार केले लंपास

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील पिंपळगाव (नाकले) रस्त्यालगत राहणाऱ्या दांपत्याचे घर (पत्र्याचे शेड) चे नट काढून पत्रा उचकटून अज्ञात चोरट्यांनी नगदी पन्नास हजार रुपये व बारा हजाराचे सोने, चांदीचे दागिने असा एकूण ६२ हजार रुपये व मुद्देमाल लंपास केल्याची घटना गुरुवारी (दि.०१) ते शुक्रवार च्या रात्रीत घडली. सदर दांपत्य बाहेरगावी असल्याने त्यांना घरात चोरी झाल्याचे उशिरा कळाल्याने शनिवारी (दि.०३) श्वान पथक व ठसे तज्ञ पथक दाखल झाल्यानंतर सायं उशिरा दिंद्रुड



ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

येथील रहिवासी सत्यभामा अभिमान ईदाटे या गावालगत असलेल्या काजीबा दर्गा शेजारील मालकीच्या जमिनीत मळ्यात (शेत) राहून, मसाला विक्रीचा व्यापार करतात. गुरुवारी त्या त्यांच्या पतीसोबत मुलाकडे (परळी) भेटण्यासाठी गेल्या असता, उशीर झाल्यामुळे मुक्कामी राहिल्या. याचा फायदा चोरट्यांनी घेतला. शुक्रवारी उशिरा गावातील तरुण सिद्धेश्वर कटारे यांना घराचे पत्रे फाटलेले दिसल्याने त्यांनी ईदाटे यांना घरात चोरी झाल्याचे फोनद्वारे कळविले. त्यावरून ईदाटे दांम्पत्याने गावाकडे (दिंद्रुड) धाव घेतली. त्यांच्या राहत्या घराच्या (शेड) पत्र्याचे नट पक्कड च्या साहाय्याने खोलून संसार उपयोगी साहित्याची उचका-उचकी करून, कपाट फोडून चोरट्यांनी नवीन साड्या सह पैसे, सोन्या-चांदीची चोरी केली. तसेच पोलिसांना महत्वाची कागदपत्रे, चोरट्यांनी वापरलेली पक्कड आदि साहित्य शेजारच्या शेतात पडलेले आढळून आले. फिर्यादीच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध दिंद्रुड पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास सपोनि महादेव ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट अंमलदार खलील मोमीन करत आहेत.

# लहान मुलांमधील दंत समस्यात वाढ; मुलांबरोबर पालकांनीही काळजी घ्यावी -डॉ. रोहन बनसोडे

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील दंतवैद्यकीय क्षेत्रातील नामवंत डॉक्टर व भारतीय दंत परिषद महाराष्ट्र राज्य सामाजिक सुरक्षा योजना शाखा अहिल्यानगर जिल्हा शहर व ग्रामीणचे अध्यक्ष रोहन उर्फ भाऊसाहेब पोपटराव बनसोडे यांनी आष्टी येथील छत्रपती शाहू महाराज दिव्यांग विद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी करून मार्गदर्शन केले तसेच ब्रश टूथपेस्ट व खाऊचे वाटप केले.





नॅशनल डेंटल असोसिएशन यांच्यावतीने आष्टी येथील दंतवैद्यकीय तज्ञ डॉ. रोहन बनसोडे यांनी आष्टी येथील छत्रपती शाहू महाराज निवासी अपंग विद्यालयांमध्ये जाऊन त्या ठिकाणच्या दिव्यांग विद्यार्थ्यांची संवाद साधत त्याच ठिकाणी मोफत दंत तपासणी व उपचार मोफत केले आहेत त्याचबरोबर त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दातांच्या आरोग्य विषयी मार्गदर्शन करून दाताची काळजी घेणे आजच्या युगात गरजेचे असून मुलांमध्ये मोठ्या प्रमाणात दातांच्या समस्या उद्भवत आहेत त्यामुळे मुलांबरोबरच पालकांनीही मुलांच्या दातांची काळजी घ्यावी मुलांचे दात व आरोग्य चांगले राहिले तरच मुलांचे भविष्य चांगले राहणार आहे त्यामुळे शाळेतील मुलांबरोबरच आपण स्वतःची काळजी घेतली पाहिजे दातांच्या विविध समस्येविषयी त्यांनी यावेळी मार्गदर्शन केले यावेळी डॉक्टर सचिन, मुख्याध्यापक विजय झांजे भाऊसाहेब ननवरे शिवाजी नलावडे सुधीर घोडके शरद तळेकर हे उपस्थित होते.

# संस्थेने मैदाने उपलब्ध करून दिली, खेळाडूंनी संधीचे सोने केले -जयसिंग पंडित

## नेत्रदीपक वातावरणात ॲथलेटिक्स स्पर्धेने झाला क्रीडा महोत्सवाचा समारोप

**गेवराई । प्रतिनिधी**

संस्थेच्या माध्यमातून खेळाडूंना मैदाने आणि ईतर सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत, विद्यार्थी खेळाडूंनी सराव करावा. खेळांच्या विविध स्पर्धांमध्ये सातत्य ठेवून खिलाडू वृत्ती जपावी. वेगवेगळ्या क्रीडा प्रकारामध्ये सहभागी होऊन आपल्या संस्थेचे आपल्या भागाचे नाव रोशन करावे. शारदा क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून मिळालेल्या संधीचे ग्रामीण भागातील खेळाडूंनी सोने केले असे प्रतिपादन जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेचे सचिव जयसिंग पंडित यांनी केले. शारदा क्रीडा महोत्सवातील ॲथलेटिक्सच्या अंतिम सामन्यांचा प्रारंभ करताना बोलत होते.



शारदा स्पोर्ट्स ॲकडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या नेतृत्वाखाली जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या अंतर्गत सुरु असलेल्या क्रिडा महोत्सवाचा समारोप रविवार दि. ४ जानेवारी रोजी शिवशारदा पब्लिक स्कूलच्या भव्य मैदानावर ॲथलेटिक्सच्या अंतिम सामन्याने करण्यात आला. यावेळी जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव जयसिंग पंडित, नगरसेवक शेख खाजामामू, गणेश रुकर, शिव शारदा मल्टीस्टेटचे उपाध्यक्ष बंडू मोटे, संचालक अवेज शरिफ,संजय पुरणपोळे, ॲड. सुभाष निकम, पत्रकार शेख जावेद, युवानेते पृथ्वीराज पंडित यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

### रणवीर पंडित यांच्या क्रीडा साधनेचा फायदा खेळाडूंना झाला-ॲड. सुभाष निकम

आपल्या भाषणात बोलताना ॲड. सुभाष निकम म्हणाले की, रणवीर पंडित यांच्या क्रीडा साधनेचा फायदा गेवराई तालुक्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना होतो आहे. जीवनात आपण कांही नाही झाले तरी चालेल मात्र आपण खेळाडू झाले पाहिजे. हा क्रीडा महोत्सवातून विद्यार्थी खेळाडूंना मोठी संधी मिळाली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर क्रीडा ज्योत प्रज्वलीत करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# किल्ले वाफगाव गजबजणार, ६ जानेवारीला महाराजा यशवंतराव होळकर राज्याभिषेक दिनाचा उत्साह

पुणे : इंग्रज सत्तेला थेट आव्हान देत संपूर्ण हिंदुस्तानात स्वातंत्र्याची ज्वाला पेटवणारे, पराक्रम, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक असलेले महाराजा यशवंतराव होळकर (प्रथम) यांचा राज्याभिषेक दिन सोहळा मंगळवार, ६ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता ऐतिहासिक किल्ले वाफगाव (ता. खेड, जि. पुणे) येथे पारंपरिक आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा होणार आहे. होळकर घराण्याचे वंशज आणि राज्याभिषेक समिती प्रमुख श्रीमंत भूषणसिंह राजे होळकर यांच्या हस्ते हा राज्याभिषेक सोहळा पार पडणार आहे. हा सोहळा केवळ एक कार्यक्रम नसून, स्वराज्याच्या इतिहासाला अभिवादन करणारा आणि होळकर घराण्याच्या पराक्रमाची आठवण करून देणारा ऐतिहासिक क्षण ठरणार आहे.



**देशभरातून मान्यवरांची उपस्थिती**

या राज्याभिषेक सोहळ्यास भारतीय लष्करातील ज्येष्ठ अधिकारी, संपूर्ण देशातून विविध ऐतिहासिक घराण्यांचे वंशज, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर, तसेच असंख्य इतिहासप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या पार्श्वभूमीवर गट-तट विसरून, स्वराज्याच्या या ऐतिहासिक कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन श्रीमंत भूषणसिंह राजे होळकर यांनी केले आहे.

**होळकर पराक्रमाची भूमी**

स्वराज्याच्या सीमा अटकेपार नेण्यात ज्यांचे योगदान अमूल्य आहे, त्या होळकर घराण्याचे वाफगाव हे मूळगाव. सुभेदार मल्हारराव होळकर यांनी उभारलेला हा भव्य भुईकोट किल्ला अनेक ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार आहे. विविध कालखंडात होळकर राजघराण्यातील सदस्यांचे वास्तव्य या किल्ल्यात राहिले आहे.

**आजही दिमाखात उभ्या असलेल्या ऐतिहासिक वास्तू**

किल्ले वाफगावमध्ये आजही इतिहासाची सजीव साक्ष देणाऱ्या अनेक वास्तू पाहायला मिळतात. त्यामध्ये भव्य प्रवेशद्वार आणि तटबंदी, राणी महाल, विष्णू पंचायतन, अंधारी विहीर आणि बुरुजातील विहीर, राजसदर, पश्चिम द्वार, भूमिगत खलबतखाने, भुयारी मार्ग आणि होळकरकालीन तोफा या वास्तू इतिहासप्रेमींना मंत्रमुग्ध करतात.


**संवर्धनातून पर्यटनस्थळाकडे वाटचाल**

सध्या किल्ले वाफगावचे संवर्धनाचे काम सुरू असून, येत्या वर्षभरात हा किल्ला एक भव्य ऐतिहासिक पर्यटनस्थळ म्हणून विकसित होणार आहे. त्यामुळे इतिहास अभ्यासक, पर्यटक आणि नव्या पिढीसाठी हा किल्ला प्रेरणास्थान ठरणार आहे. महाराजा यशवंतराव होळकर यांचा राज्याभिषेक दिन सोहळा म्हणजे स्वराज्य, स्वाभिमान आणि शौर्याच्या परंपरेला दिलेले मानाचे वंदन आहे. ६ जानेवारी २०२६ रोजी किल्ले वाफगाव येथे इतिहास पुन्हा एकदा जिवंत होणार असून, हा क्षण प्रत्येक इतिहासप्रेमी भारतीयासाठी अभिमानाचा ठरेल अशी अपेक्षा श्रीमंत भूषणसिंह राजे होळकर यांनी व्यक्त केली आहे.

# अल्पवयीन मुलीची छेडछाड; परप्रांतीय मजुरावर गुन्हा दाखल

**राजगुरुनगर । प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील पूर्व भागातील एका गावात अल्पवयीन महाविद्यालयीन आदिवासी मुलीची छेडछाड झाल्याची गंभीर घटना उघडकीस आली असून, या प्रकरणी खेड पोलीस ठाण्यात पोस्को कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेप्रकरणी उत्तर प्रदेशातील २३ वर्षीय कामगाराला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.



पीडित मुलगी राजगुरुनगर येथील एका महाविद्यालयात इयत्ता बारावीत शिक्षण घेत असून, ती दररोज वाफगाव-राजगुरुनगर एस.टी. बसने महाविद्यालयात ये-जा करते. तिच्या वस्तीपासून सुमारे १०० मीटर अंतरावर असलेल्या खडी क्रशर प्लांटवर बाहेर राज्यातील कामगार कार्यरत आहेत. गेल्या काही दिवसांपासून त्यातील एक कामगार तिच्याकडे संशयास्पद नजरेने पाहत असल्याचे तिच्या लक्षात आले होते.गुरुवारी (दि. १) सकाळी सुमारे १०.३० वाजता ठाकरवाडी फाटा येथील बसथांब्यावर पीडित मुलगी व तिची चुलत बहीण बसची वाट पाहत असताना आरोपी अजय शामलाल पाल (वय २३, रा. मुंडडा, पोस्ट सैयदराजा, ता. सादराजा, जि. चंदौली, उत्तर प्रदेश) याने तिच्याशी हिंदी भाषेत बोलत वहि व पेन मागितले. त्यानंतर त्याने वहित आक्षेपार्ह मजकूर लिहून मोबाइल क्रमांक देत संपर्क साधण्याचा प्रयत्न केला.

हा प्रकार लक्षात येताच मुलीने संबंधित कागद फाडून टाकत तात्काळ नातेवाइकांना घटनेची माहिती दिली. यानंतर संध्याकाळी कुटुंबीय आरोपीकडे जाब विचारण्यासाठी गेले असता, त्यांच्यावर दबाव आणण्याचा व धमकावण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी एका व्यक्तीने हत्यारासह धाव घेण्याचा प्रयत्न केल्याने परिस्थिती तणावपूर्ण बनली. याबाबत तात्काळ डायल ११२ वर संपर्क साधण्यात आला. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत आरोपी अजय पाल याला ताब्यात घेतले. खेड पोलिसांनी आरोपीविरोधात अल्पवयीन मुलीची छेडछाड, धमकावणे तसेच पोस्को कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून, पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, बाहेर राज्यातून आलेल्या कामगारांच्या वर्तणुकीबाबत स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

# अजित पवारांच्या राष्ट्रवादीला मोठा धक्का; उमेदवारावर गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. प्रभाग क्रमांक ३५ मधील राष्ट्रवादीचे उमेदवार फारुख इनामदार यांच्याविरोधात खंडणी मागणे आणि आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रभाग ४१ मधील रहिवासी सादिक कपूर यांनी जीवन संपवल्यानंतर त्यांच्या मुलाने दिलेल्या फिर्यादीवरून लष्कर पोलीस ठाण्यात हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



सादिक कपूर यांनी लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये फारुख इनामदार यांचे नाव नमूद केले असून, त्यांच्या हातावरही इनामदार यांचे नाव लिहिलेले आढळून आले आहे. या प्रकरणात फारुख इनामदार यांच्यासह एकूण चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जमीन व्यवहार आणि खंडणीच्या वादातून सादिक कपूर यांनी टोकाचं पाऊल उचलल्याचा प्राथमिक तपासात निष्कर्ष निघत आहे. पोलीस उपायुक्त राजलक्ष्मी शिवणकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींकडून सादिक कपूर यांच्याकडे ५० लाख रुपयांची खंडणी मागण्यात आली होती. सुसाईड नोटमध्ये तब्बल ३८ जणांची नावे असून, सर्वांची भूमिका तपासण्यात येणार आहे. मृत सादिक कपूर हे मोक्का अंतर्गत आरोपी होते आणि त्यांच्यावर दोन गुन्हे दाखल असून ते फरार होते, अशी माहितीही पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.



# 'शरद पवार इन्स्पायर फेलोशिप'पासून ९ साहित्यिकांनी घेतली फारकत

**पुणे । प्रतिनिधी**

शरद पवार एआय सेंटरच्या (-ख उशपींीश) उद्घाटन कार्यक्रमाला उद्योगपती गौतम अदानी यांना निमंत्रित केल्याच्या निषेधार्थ 'शरद पवार इन्स्पायर फेलोशिप'मधून ९ साहित्यिकांनी फारकत घेतली आहे. त्यांनी खासदार सुप्रिया सुळे यांना पत्र लिहून आपण 'मार्गदर्शक' पदावरून बाजूला होत असल्याचे स्पष्ट केले आहे. शरद पवार एआय सेंटरच्या एका कार्यक्रमात गौतम अदानी यांची प्रमुख उपस्थिती आणि त्यांना दिलेले आमंत्रण याला या साहित्यिकांनी कडाडून विरोध दर्शवला आहे. अदानी समूहावर होत असलेले आरोप आणि सद्यस्थितीतील राजकीय-सामाजिक वातावरण पाहता, त्यांच्यासोबत व्यासपीठ शेअर करणे आपल्याला मान्य नसल्याची भूमिका या साहित्यिकांनी घेतली आहे. गेल्या चार वर्षांपासून हे ९ साहित्यिक या फेलोशिपच्या निवड प्रक्रियेसाठी आणि मार्गदर्शनासाठी काम करत होते. मात्र, आता त्यांनी खासदार सुप्रिया सुळे यांना पत्र लिहून आपण 'मार्गदर्शक' पदावरून बाजूला होत असल्याचे स्पष्ट केले आहे.

# श्री थापलिंग यात्रेला उत्साहात प्रारंभ; पहिल्याच दिवशी एक लाख भाविकांनी घेतले खंडोबा देवाचे दर्शन

**आंबेगाव । प्रतिनिधी**

नागापूर (ता. आंबेगाव) येथील प्रसिद्ध श्री थापलिंग यात्रेला शनिवारी (दि. ३) भक्तिभावाच्या आणि उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. यात्रेच्या पहिल्याच दिवशी सुमारे एक लाखाहून अधिक भाविकांनी खंडोबा देवाचे दर्शन घेतले. 'सदानंदाचा येळकोट' असा जयघोष करून पारंपरिक तळीभंडार केला.



पौष पौर्णिमेला थापलिंग गडावर दोन दिवस मोठी यात्रा भरते. यंदा यात्रा शनिवारी रविवारी सुट्ट्यांच्या दिवशी आल्याने पहिल्याच दिवशी दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली. सकाळपासूनच गडावर भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. राज्याच्या विविध भागांतून तसेच परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने यात्रेसाठी दाखल झाले होते. यावेळी अनेक भाविकांनी भाविकांनी जागरण करून कुलाचार पूर्ण करून श्री खंडोबा देवाच्या चरणी कृतज्ञता व्यक्त केली. येळकोट येळकोट जय मल्हारच्या गजराने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. दुपारी गडावर रांजणी वळती येथील खुडे बंधूंच्या काठीपालख्या वाजत गाजत आल्या. यात्रेच्या पहिल्या दिवशी सुमारे एक लाख भाविकांनी श्री खंडोबा देवाचे दर्शन घेतल्याची माहिती मंदिर प्रशासनाकडून देण्यात आली. भाविकांच्या सोयीसाठी दर्शन रांग, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य सेवा तसेच वाहतूक नियंत्रणाची योग्य व्यवस्था करण्यात आली होती. यात्रेत कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पारगाव कारखाना पोलिस ठाण्याच्या वतीने चोख बंदोबस्त गडावर ठेवण्यात आला आहे. थापलिंग गडावर जिलेबी, भजी, हॉटेल, रसवंतीगृहे, गरम कपड्यांची दुकाने, खेळण्याची दुकाने, आकाशी पाळणे, लहान मुलांसाठी पाळणे मोठ्या प्रमाणावर व्यावसायिकांनी लावले आहेत.

# अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न; आरटीआय कार्यकर्त्यावर गुन्हा दाखल

**मंचर । प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलीला जीवे मारण्याची धमकी देत तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी मंचर येथील आरटीआय कार्यकत्याविरुद्ध मंचर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिढीत मुलीने मंचर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, शुक्रवार दि.२ रोजी पिढीत अल्पवयीन मुलगी व तिचा मित्र मोटरसायकलने ओझर येथून सासवडकडे जात असताना मंचर येथे एका हॉटेलजवळ आले असता त्याचे मोटरसायकलचे पेट्रोल संपले. त्यावेळी अल्पवयीन मुलीचा मित्र पेट्रोल आणण्यासाठी गेला होता. संबंधित मुलगी एका हॉटेलमध्ये जेवण करण्यास थांबली होती.

त्यावेळी त्या ठिकाणी श्याम थोरात यांनी मुलीला तुला पेट्रोल पंपाजवळ सोडतो, असे सांगून तीला चारचाकी गाडीत बसवून तिला कळंब (ता.आंबेगाव) येथील एका हॉटेलजवळ आणले. त्या ठिकाणी गाडी थांबवून गाडीचा दरवाजा लॉक करून त्या मुलीला जीवे मारण्याची धमकी देत तिच्यावर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी शाम शांताराम थोरात यांच्यावर मंचर पोलीस ठाण्यात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शाम थोरात हा आरटीआय कार्यकर्ता असून त्याने यापूर्वीही अनेकांना त्रास दिल्याच्या तक्रारी मंचर पोलीस ठाण्यात दाखल आहेत. थोरात याने अजूनही कुणाला त्रास दिला असल्यास त्यांनी मंचर पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन मंचर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ यांनी केले आहे.पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सुनील बडगुजर करत आहे.

किल्ले वाफगाव गजबजणार, ६ जानेवारीला महाराजा यशवंतराव होळकर राज्याभिषेक दिनाचा उत्साह

पुणे । प्रतिनिधी

इंग्रज सत्तेला थेट आव्हान देत संपूर्ण हिंदुस्तानात स्वातंत्र्याची ज्वाला पेटवणारे, पराक्रम, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक असलेले महाराजा यशवंतराव होळकर (प्रथम) यांचा राज्याभिषेक दिन सोहळा मंगळवार, ६ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता ऐतिहासिक किल्ले वाफगाव (ता. खेड, जि. पुणे) येथे पारंपरिक आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा होणार आहे. होळकर घराण्याचे वंशज आणि राज्याभिषेक समिती प्रमुख श्रीमंत भूषणसिंह राजे होळकर (इर्हीहरपीळहर ठरक्षश केश्रझरी) यांच्या हस्ते हा राज्याभिषेक सोहळा पार पडणार आहे. हा सोहळा केवळ एक कार्यक्रम नसून, स्वराज्याच्या इतिहासाला अभिवादन करणारा आणि होळकर घराण्याच्या पराक्रमाची आठवण करून देणारा ऐतिहासिक क्षण ठरणार आहे.

या राज्याभिषेक सोहळ्यास भारतीय लष्करातील ज्येष्ठ अधिकारी, संपूर्ण देशातून विविध ऐतिहासिक घराण्यांचे वंशज, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर, तसेच असंख्य इतिहासप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या पार्श्वभूमीवर गट-तट विसरून, स्वराज्याच्या या ऐतिहासिक कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन श्रीमंत भूषणसिंह राजे होळकर यांनी केले आहे.

स्वराज्याच्या सीमा अटकेपार नेण्यात ज्यांचे योगदान अमूल्य आहे, त्या होळकर घराण्याचे वाफगाव हे मूळगाव. सुभेदार मल्हारराव होळकर यांनी उभारलेला हा भव्य भुईकोट किल्ला अनेक ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार आहे. विविध कालखंडात होळकर राजघराण्यातील सदस्यांचे वास्तव्य या किल्ल्यात राहिले आहे. किल्ले वाफगावमध्ये आजही इतिहासाची सजीव साक्ष देणाऱ्या अनेक वास्तू पाहायला मिळतात. त्यामध्ये भव्य प्रवेशद्वार आणि तटबंदी, राणी महाल, विष्णू पंचायतन, अंधारी विहीर आणि बुरुजातील विहीर, राजसदर, पश्चिम द्वार, भूमिगत खलबतखाने, भुयारी मार्ग आणि होळकरकालीन तोफा या वास्तू इतिहासप्रेमींना मंत्रमुग्ध करतात. सध्या किल्ले वाफगावचे संवर्धनाचे काम सुरू असून, येत्या वर्षभरात हा किल्ला एक भव्य ऐतिहासिक पर्यटनस्थळ म्हणून विकसित होणार आहे. त्यामुळे इतिहास अभ्यासक, पर्यटक आणि नव्या पिढीसाठी हा किल्ला प्रेरणास्थान ठरणार आहे महाराजा यशवंतराव होळकर यांचा राज्याभिषेक दिन सोहळा म्हणजे स्वराज्य, स्वाभिमान आणि शौर्याच्या परंपरेला दिलेले मानाचे वंदन आहे. ६ जानेवारी २०२६ रोजी किल्ले वाफगाव येथे इतिहास पुन्हा एकदा जिवंत होणार असून, हा क्षण प्रत्येक इतिहासप्रेमी भारतीयासाठी अभिमानाचा ठरेल अशी अपेक्षा श्रीमंत भूषणसिंह राजे होळकर यांनी व्यक्त केली आहे.



# रस्ता ओलांडताना पिकअपची जोरदार धडक; अज्ञात महिलेचा मृत्यू

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

कोरेगाव भीमा (ता. शिरूर) येथील कल्याणी फोर्ज कंपनीजवळ रस्ता ओलांडत असताना एका अज्ञात महिलेला भरधाव पिकअपची धडक बसली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून, शिक्रापूर पोलिसांनी पिकअप चालकावर गुन्हा दाखल केला आहे. अद्याप महिलेची ओळख पटलेली नसल्याने पोलिसांनी नागरिकांना माहिती देण्याचे आवाहन केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही महिला महामार्ग ओलांडत असताना अहिल्यानगरकडून भरधाव वेगाने आलेल्या एमएच १२ व्हीटी २४१४ या पिकअपची जोरदार धडक बसली. या धडकेत महिला गंभीर जखमी झाल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाला. याप्रकरणी अजय हनुमंत जाधव (वय २५, रा. सणसवाडी, ता. शिरूर) यांनी शिक्रापूर पोलिसात फिर्याद दिली. त्यावरून पोलिसांनी पिकअप चालक राहुल रामचंद्र यादव (वय २६, रा. येवलेवाडी कोंढवा, जि. पुणे) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. महिलेची ओळख पटवण्यासाठी पोलिसांनी परिसरात शोध घेतला, मात्र अद्याप यश आले नाही.मृत महिलेचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे: रंग गोरा, लांब केस, डाव्या हाताच्या मनगटावर '-ड' आणि 'बदाम' चिन्ह तसेच हाताच्या मधल्या बोटावर '-' अक्षर गोंदलेले आहे. अंगात लाल व पांढऱ्या रेषांचा टी-शर्ट आणि काळी पँट परिधान केलेली आहे. या वर्णनाच्या महिलेबाबत कोणास काही माहिती असल्यास त्यांनी तातडीने शिक्रापूर पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस हवालदार गणेश कुदळे यांनी केले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# बिबट पीडित कुटुंबांना प्रत्येकी ५ लाख रुपये सुपूर्द

**जांबूत । प्रतिनिधी**

संकट काळात मी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, असा शब्द देणारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पिंपरखेड आणि जांबूत येथील बिबट्या हल्ल्यातील पीडित कुटुंबांना दिलेला शब्द खरा केला आहे. बिबट्याच्या हल्ल्यात जीव गमावलेल्या रोहन बोंबे, शिवन्या बोंबे आणि भागुबाई जाधव यांच्या कुटुंबीयांना शिवसेना पक्ष निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत सुपूर्द करण्यात आली आहे.



पिंपरखेड परिसरात एका महिन्यात बिबट्याने केलेल्या हल्ल्यात शिवन्या बोंबे, रोहन बोंबे तसेच जांबूत येथील भागुबाई जाधव यांना आपला जीव गमवावा लागला होता. या दुःखद घटनेनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने पीडित कुटुंबांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले होते. त्यावेळी त्यांनी या कुटुंबांना शासनाच्या मदतीबरोबरच वैयक्तिक स्तरावरही आर्थिक मदत देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार ही मदत देण्यात आली आहे.मदतनिधी सुपूर्द करत असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून मृतांच्या कुटुंबीयांशी संवाद साधला. घडलेल्या घटना अतिशय दुर्दैवी असून अशा घटना पुन्हा घडू नये यासाठी शासन प्रयत्नशील आहे, असे सांगत त्यांनी कुटुंबाला धीर दिला. राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांनी थेट व्हिडिओ कॉल करून विचारपूस केल्याने पीडित कुटुंबीय भावूक झाले होते. उपमुख्यमंत्र्यांच्या वतीने आमदार शरद सोनवणे, युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण, माजी पंचायत समिती सदस्य डॉ. सुभाष पोकळे, युवानेते सचिन बांगर, बापूसाहेब शिंदे तसेच शिवसेना पक्षाच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष तीनही पीडित कुटुंबांना प्रत्येकी पाच लाखांचा धनादेश सुपूर्द केला. दिलेला शब्द प्रत्यक्ष कृतीतून पाळल्याबद्दल स्थानिक नागरिकांनी आणि ग्रामस्थांनी एकनाथ शिंदे यांचे आभार मानले आहेत.

# महिलांच्या यशाचे श्रेय फक्त सावित्रीबाईंनाच-जयदीप बारभाई



**जेजुरी । प्रतिनिधी**

स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, थोर समाजसुधारिका, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त नवनिर्वाचित नगराध्यक्ष जयदीप बारभाई, उपाध्यक्ष गणेश निकुडे यांच्या हस्ते नगरपरिषद कार्यालयात प्रतिमापूजन करीत अभिवादन करण्यात आले. यावेळी नगरसेवक पै. कृष्णा कुदळे, योगेश जगताप, माजी नगराध्यक्ष रोहिदास कुंभार, राष्ट्रवादी शहराध्यक्ष रमेश लेंडे, भगवान डिखळे, पंढरीनाथ जाधव, गौतम भालेराव आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.नगराध्यक्ष बारभाई म्हणाले की, सावित्रीबाई फुले यांचे कार्य आजच्या पिढीला प्रेरणास्रोत असून १७७ वर्षांपूर्वी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवताना अनेक कर्मठ-अनिष्ठ, जुन्या रूढी परंपरेच्या विरोधात लढा देणाऱ्या फुले दाम्पत्याने नवा इतिहास घडविल्यानेच आजच्या आधुनिक व यांत्रिक युगात प्रत्येक क्षेत्रामध्ये महिला अग्रभागी आहेत. त्याचे सर्व श्रेय हे फुले दाम्पत्याला जाते. त्यांच्या कार्याचा आदर्श संपूर्ण देशाने घेतला आहे. सर्व घटकांतील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे मोठे कार्य केले आहे. त्यामुळे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्याविषयी सर्व महिला कृतज्ञता व्यक्त करतात.

# मृत्यूचा सापळा बनलेल्या खड्ड्यावरून ग्रामस्थ आक्रमक

**आळंदी । प्रतिनिधी**

आळंदी-मरकळ रस्त्यावरील चर्होली खुर्द ग्रामपंचायत हद्दीतील प्रमुख मार्गाच्या कडेला ओढा खोलीकरणातून पडलेला एक भला मोठा खड्डा सध्या वाहनचालकांसाठी अक्षरशः मृत्यूला आमंत्रण देत आहे. गेल्या कित्येक महिन्यांपासून हा खड्डा तसाच उघडा असून, चर्होली खुर्द ग्रामपंचायत व सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व) यांचे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थ व वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.





या ठिकाणी पूर्वी असलेली नैसर्गिक मोरी बंद केल्याने पावसाळ्यात तसेच रात्रीच्या वेळी रस्त्याच्या कडेला असलेला हा खड्डा वाहनचालकांच्या सहज नजरेत न पडता मोठ्या अपघातास कारणीभूत ठरू शकतो. विशेषतः दुचाकीस्वार, पादचारी व अवजड वाहनांसाठी हा खड्डा अत्यंत धोकादायक ठरत आहे. भविष्यात एखाद्या निष्पाप नागरिकाचा बळी जाऊ शकतो, अशी भीती परिसरातील नागरिक व्यक्त करत आहेत. या संदर्भात ग्रामस्थांनी व वाहनचालकांनी अनेक वेळा संबंधित प्रशासनाकडे तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे आता नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. येत्या पंधरा दिवसांच्या आत प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन सदर खड्डा तात्काळ बुजवावा, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. अन्यथा संबंधित विभागांविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.